दैनिक
# लोकविजय
संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १७१) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शनिवार, दि.०४ जुलै २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## केतन अग्रवाल हत्या प्रकरणी सिया अन् चेतनची न्यायालयीन कोठडीत रवानगी

पुणे दि.३ (प्रतिनिधी)- केतन अग्रवाल हत्या प्रकरणात सिया गोयल आणि चेतन चौधरीची पोलीस कोठडी संपली. त्यामुळं आज या दोघांना वडगाव मावळ न्यायालयात दुपारी हजर करण्यात आलं. न्यायाधीश ए.एम. विभूतेंच्या समोर ही सुनावणी पार पडली. आज न्यायालयात हजर करण्यापूर्वी गेल्या पाच दिवसांच्या पोलीस कोठडीत कसून तपास करण्यात आला, यात पोलिसांच्या हाती लागलेले महत्वाचे धागेदोरे न्यायालयात सादर केले. यावेळी पोलिसांनी आरोपींच्या पोलीस कोठडीत वाढ करण्याची मागणी केली होती, मात्र न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर पोलिसांची मागणी फेटाळून लावत आरोपींची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली आहे.

गेल्या पाच दिवसांच्या पोलीस कोठडीत तपास यंत्रणांनी अनेक महत्त्वाचे पुरावे गोळा केल्याचा दावा न्यायालयात करण्यात आला. घटनास्थळाचा पंचनामा, आरोपींनी सराव केल्याचे सांगितल्या जाणाऱ्या ठिकाणाचा पंचनामा, फाडून टाकलेल्या पासपोर्टशी संबंधित ठिकाणाचा पंचनामा, आरोपींचे कपडे जप्त करणे आणि मोबाईलमधील डिलीट डेटा रिकव्हर करणे अशी तपासाची माहिती न्यायालयासमोर मांडण्यात आली.

# पुढील ४ दिवसात राज्यात मुसळधार पाऊस

## नदीकाठासह डोंगराळ भागातील लोकांना सतर्क राहावं, हवामान विभागाचा इशारा

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- राज्यातील काही भागात जोरदार पाऊस कोसळत आहे. तर काही भागात अद्याप म्हणावा तसा पाऊस झालेला नाही. मुंबईसह कोकणात आणि विदर्भातील काही भागात चांगला पाऊस कोसळत आहे. दरम्यान, अशातच हवामान विभागानं महत्वाची माहिती दिली आहे. महाराष्ट्रात ३ ते ७ जुलै दरम्यान पावसाचा जोर वाढणार असल्याची माहिती हवामान विभागानं दिली आहे.

३ ते ७ जुलैदरम्यान राज्यभर पावसाच्या जोरदार सरींचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार, कोकण आणि घाटमाथ्यावर अनेक ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. काही ठिकाणी अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात विजांच्या कडकडाटासह मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. विदर्भातही ३ ते ७ जुलैदरम्यान काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. महाराष्ट्र ते कर्नाटक किनारपट्टीदरम्यान ऑफ-शोअर ट्रफ सक्रिय आहे.

वायव्य बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झालं आहे. ते पुढील दोन दिवसांत अधिक प्रभावी होण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर नदीकाठ, डोंगराळ भाग आणि सखल परिसरातील नागरिकांनी सतर्क राहावं असं आवाहन देखील हवामान विभागाच्या वतीनं करण्यात आलं आहे. स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे आणि अनावश्यक प्रवास टाळावा असे आवाहन हवामान विभागानं केलं आहे.

चिपळूणमध्ये जोरदार वाऱ्यासह मुसळधार पाऊस कोसळत आहे. या पावसामुळं शहरातील सखल भागात पाणी साचलं आहे. दुपारनंतर चिपळूणमध्ये पावसाचा जोर वाढला आहे. खेडमध्ये जगबुडी नदीने इशारा पातळी ओलांडली आहे. चिपळूणसह खेड, गुहागर, दापोली भागात जोरदार पाऊस सुरु आहे.

नाळिक जिल्ह्यात देखील दमदार पावसाला सुरुवात झाली आहे. महिनाभराच्या विश्रांतीनंतर नाशिकच्या कळवण पश्चिम पट्ट्यात पावसाने आज जोरदार बॅटिंग करत सुरुवात केली. आज झालेल्या दमदार पाऊसामुळे सर्वत्र पाणीच पाणी झाले होते. तर अनेक घराच्या पायरीपर्यंत पावसाचे पाणी शिरलं आहे. पावसामुळे कच्च्या घरच्या भिंती पडण्याची दाट शक्यत निर्माण झाली आहे. दरम्यान, पावसाच्या आगमनाने बळीराजा आनंदला असून पश्चिम पट्ट्यात भात लागवडीसह खरीप पिकांच्या पेरणीला वेग येणार आहे.

**मुंबईत सलग तिसऱ्या दिवशी मुसळधार पावसाची हजेरी**

मुंबईत आज सलग तिसऱ्या दिवशी मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. पहाटेपासूनच शहर आणि उपनगरांमध्ये जोरदार सरी कोसळत असून पावसाचा जोर




कायम आहे. गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून आकाश ढगाळ आहे. हवामान विभागाने मुंबईत पुढील काही तासांतही मध्यम ते जोरदार, तर काही ठिकाणी अतिजोरदार पावसाची शक्यता व्यक्त केली आहे. त्यामुळे मुंबईकरांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दुसरीकडे, मुंबईसह पश्चिम उपनगरात मध्यरात्रीपासून जोरदार पाऊस सुरू आहे. पश्चिम उपनगरात अंधेरी,जोगेश्वरी, गोरेगाव, मालाड, कांदिवली, बोरिवली, दहिसर, विलेपार्ले, सांताक्रुझ, वांद्रे या सर्व परिसरामध्ये (पान ४ वर)

## अब हिंदू माफ नहीं करेगा!:राम मंदिरातील चोरीवरून उद्धव ठाकरेंचा संताप, दादरमध्ये करणार रामरक्षा आंदोलन

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- देशात सध्या अयोध्या राम मंदिराचा मुद्दा चांगलाच गाजत आहे. राम मंदिरात मोठी चोरी झाल्याने खळबळ उडाली आहे. यावरून विरोधकांनी भाजपवर निशाणा साधण्यास सुरुवात केली आहे. शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत निषेध नोंदवला आहे. तसेच येत्या ५ तारखेपासून दादरच्या हनुमान मंदिरासमोर रामरक्षा आंदोलन सुरू करण्यात येणार असल्याची माहिती ठाकरे यांनी दिली आहे. तसेच जे हिंदू आहेत त्या सर्वांनी तिथे यावे, असे आवाहन देखील त्यांनी केले आहे.



उद्धव ठाकरे म्हणाले, आज संपूर्ण देशात जो काही गोंधळ सुरू आहे, जी काही अनास्था निर्माण झाली आहे याचे जे मूळ आहे त्यावर आघात करण्याची वेळ आली आहे. संपूर्ण देश भाजपच्या अमलाखाली आहे. भाजपच्या सत्तेचे जे मूळ आहे, ज्यात आम्ही देखील सहभागी होतो ते म्हणजे राम मंदिर. राम मंदिरासाठी जे आंदोलन झाले होते, त्यात अनेक शिवसैनिक होते. देशातील तमाम हिंदू सहभागी होता. तो काल आजही आपल्याला आठवत असेल. ती सारी दृश्य जनतेच्या मनावर खोलवर रुजलेली आहे.

पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, कारसेवकांवर झालेले अत्याचार, त्यानंतर झालेले गोधरा हत्याकांड, अहमदाबाद मधली दंगल, मुंबईत सुद्धा जे काही घडले होते, त्यात हिंदूंनी बरेच काही सोसले होते. त्या सगळ्याचे भांडवल करून भाजप जो हे आंदोलन सुरू होण्याआधी संपूर्ण देशात त्यांचे फक्त दोनच खासदार होते. गांधीवादी समाजवाद हा त्यांनी अंगीकारलेला एक कार्यक्रम होता, ते सोडून ते राम मंदिर हिंदुत्वाकडे वळले. राम मंदिराच्या मुद्द्याला हात घातला आणि आज देशात अमर्याद सत्ता भोगत आहेत.

# स्मार्ट मीटरवरून विधानसभेत खडाजंगी

### राज्यात सर्वांसाठी अनिवार्य, प्रीपेड मीटर ऐच्छिक-राज्यमंत्री मेघना बोर्डीकर
### सरकारचा स्मार्ट दिखावा, ही जनतेची थेट लूट; नाना पटोले भडकले

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- राज्यातील वीज ग्राहकांसाठी स्मार्ट मीटर बंधनकारक करण्यात आल्याच्या निर्णयावरून विधानसभेत आज मोठा गदारोळ पाहायला मिळाला. ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी "स्मार्ट मीटर बंधनकारक असून प्रीपेड मीटर ऐच्छिक आहे," असे स्पष्टीकरण देताच विरोधी बाकांवरून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. "ही जनतेची लूट करणारे खोटे बोलणारे सरकार आहे," असा घणाघात पटोले यांनी केला. विशेष म्हणजे, सत्ताधारी गटाचे आमदार नितेश राणे यांनीही ग्रामीण भागात स्मार्ट मीटरवरून प्रचंड असंतोष असून, "अधिकारी कधीही मार खातील," असा इशारा देत घरचा आहेर दिला. सोलापूरचे आमदार देवेंद्र कोठे आणि भीमराव तापकीर यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेवर विधानसभेत ही चर्चा झाली.

राज्यात विविध विद्युत कायद्यानुसार सर्व वीज वितरण कंपन्यांसाठी स्मार्ट मीटर बसवणे बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र, प्रीपेड स्मार्ट मीटर स्वीकारणे ग्राहकांसाठी ऐच्छिक राहील. राज्यात आतापर्यंत १ कोटी २३ लाख ग्राहकांकडे स्मार्ट मीटर बसवण्यात आले आहेत. त्यापैकी ३ लाख ९२ हजार ग्राहकांच्या वीजबिलांबाबत तक्रारी प्राप्त झाल्या असून, अधिकारी प्रत्यक्ष भेट देऊन त्याचे निराकरण करत आहेत. बिलवाढीच्या अनेक तक्रारी चुकीच्या असल्याचा दावाही राज्यमंत्र्यांनी केला.

राज्यमंत्र्यांच्या या उत्तरावर नाना पटोले प्रचंड आक्रमक झाले. त्यांनी सभागृहात आणि माध्यमांसमोर सरकारला धारेवर धरत अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले. ते म्हणाले, "स्मार्ट मीटर बसवण्याचे कंत्राट नेमक्या कोणत्या मोठ्या कंपनीला दिले आहे, त्याचे नाव सरकार का लपवत आहे? महावितरणचे अधिकारी किंवा लाईनमन न पाठवता, कंत्राटदाराची खाजगी माणसे लोकांच्या घरात घुसून जबरदस्तीने जुने चांगले मीटर काढून स्मार्ट मीटर लावत आहेत. नवीन स्मार्ट मीटर इतक्या वेगाने फिरतात की, ग्राहकांना पूर्वीपेक्षा तीन ते चार पट अधिक वीज बिल येत आहे. आधीच महागाईने होरपळणाऱ्या जनतेचे आर्थिक नियोजन या स्मार्ट मीटरने कोलमडले असून, ही थेट जनतेची लूट आहे."

## अण्णा हजारेंचे ५ जुलैचे उपोषण स्थगित

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- माहिती अधिकार कायद्यातील प्रस्तावित बदलांच्या विरोधात ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी पुकारलेले ५ जुलैचे नियोजित उपोषण अखेर स्थगित करण्यात आले आहे. राज्य सरकारने माहिती अधिकार नियमातील वादग्रस्त बदल ांना तात्पुरती स्थगिती देण्याची घोषणा केल्यानंतर अण्णांनी हा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या घोषणेनंतर हे उपोषण जरी स्थगित झाले असले, तरी अण्णा हजारे आपल्या मागण्यांवर ठाम असून त्यांनी सरकारला पुढील इशाराही दिला आहे. सरकारने केवळ या बदलांना स्थगिती दिली असली, तरी अण्णा हजारे यांचे समाधान झालेले नाही. 'माहिती अधिकारातील नवे नियम केवळ स्थगित करून चालणार नाही, तर ते कायमचे रद्द करण्यात यावेत,' अशी आग्रही मागणी अण्णांनी केली आहे.

# हिंदू धर्माला बदनाम करू पाहणाऱ्या शक्तींचे मनसुबे यशस्वी होऊ देऊ नका

## राम मंदिर गैरव्यवहार प्रकरणी आरएसएसचे दत्तात्रेय होसबाळे यांची प्रतिक्रिया

नवी दिल्ली दि.३ (वृत्तसस्था) अयोध्या येथील भव्य राम मंदिरातील दानपेटीतून झालेल्या चोरीच्या आणि आर्थिक गैरव्यवहाराच्या प्रकरणावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने चिंता आणि संताप व्यक्त केला आहे. ही घटना अत्यंत वेदनादायी असून कोट्यवधी रामभक्तांच्या भावना दुखावणारी आहे, असे संघाने म्हटले आहे. तसेच मंदिर प्रशासनात अधिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व आणण्याची मागणी केली आहे.

आरएसएसचे सरकार्यवाह (सरचिटणीस) दत्तात्रेय होसबाळे यांनी नवी दिल्लीतून एक निवेदन प्रसिद्ध केले आहे. ते म्हणाले, "श्री रामजन्मभूमीवरील हे भव्य मंदिर पिढ्यानपिढ्यांच्या त्याग आणि समर्पणातून उभे राहिले असून, ते हिंदू समाजाच्या श्रद्धेचे प्रतीक आहे. दानपेटीतील चोरीच्या या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण समाज आणि रामभक्तांमध्ये तीव्र संताप आहे."

उत्तर प्रदेश सरकारने या प्रकरणाच्या चौकशीसाठी 'एसआयटी' स्थापन केली असून कायदेशीर कारवाई सुरू केली आहे. या तपासात जे कोणी दोषी आढळतील, त्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

होसबाळे यांनी 'श्री रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्ट'ला आवाहन केले की, त्यांनी या घटनेकडे एक अपवादात्मक गंभीर बाब म्हणून पाहावे. मंदिराच्या व्यवस्थापनातील आणि कामकाजातील त्रुटी तातडीने दूर कराव्यात, जेणेकरून भक्तांच्या मनातील संभ्रम दूर होईल. पारदर्शक कारभार, चोख आर्थिक व्यवस्थापन आणि पवित्र वातावरण याद्वारेच हिंदू समाजाचा विश्वास अधिक दृढ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## कुंभमेळ्याच्या निधीत २४१ कोटींचा घोटाळा!

### अनिल परब यांचा विधान परिषदेत गंभीर आरोप

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- पावसाळी अधिवेशनादरम्यान विधान परिषदेतील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार अनिल परब यांनी आज सार्वजनिक बांधकाम विभागातील ठेकेदारीतील गैरव्यवहार, मुंबई महानगरपालिकेतील निधी वाटपातील दुजाभाव आणि पुण्याच्या विषारी दारूकांडावर राज्य सरकारला धारेवर धरले. विशेषतः आगामी नाशिक कुंभमेळ्यासाठी काढण्यात आलेल्या हजारो कोटी रुपयांच्या टेंडर प्रक्रियेत रिंग तयार करून मोठा भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आणि या प्रकरणाची एसआयटी चौकशी करून फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली.

नाशिकमध्ये २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने काढलेल्या टेंडर प्रक्रियेत मोठा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप परब यांनी पुराव्यांसह केला.

कुंभमेळ्यासाठी एकट्या नाशिक जिल्ह्यासाठी २२७० कोटी (पान ४ वर)

# दूध आणि दुग्धजन्य पदार्थात भेसळ करणाऱ्यांची आता खैर नाही; आयुक्त तुकाराम मुंढे यांचा कारवाईचा इशारा

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- दूध आणि दुग्धजन्य पदार्थात होणारी भेसळ रोखण्यासाठी राज्याचे अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. ज्याप्रकारे हॉटेल आणि रेस्टॉरंटच्या बाबतीत सूचना देण्यात आल्या होत्या, त्याप्रमाणेच आता दूध भेसळीच्या विरोधात कठोर पावले उचलली जाणार असल्याची माहिती तुकाराम मुंढे यांनी पत्रकार परिषदेद्वारे दिली.

दूध भेसळीबाबतचे नवे नियम हे दूध उत्पादकापासून ते ग्राहकापर्यंत सर्वांना लागू असतील, असेही मुंढे यांनी स्पष्ट केले. फार्म टू प्लेट या संकल्पनेनुसार या साखळीत जे जे लोक सामील आहेत, त्या सर्वांवर मार्गदर्शक सूचना लागू होणार आहेत, असेही ते म्हणाले.

दूध उत्पादक, दूध गोळा करणाऱ्यांपासून ते कोल्ड चेनपर्यंत, प्रक्रिया करण्यापासून ते वाहतुकीद्वारे विक्रेत्यांपर्यंत दूध पोहोचवण्याकरिता जे जे लोक कार्यरत आहेत, त्या सर्वांना २०११ सालचे परवान्याचे किंवा नोंदणीचे मानक लागू आहेत. अन्न उत्पादन मानके व अन्न संयोजके याचेही नियम लागू आहेत. त्याचबरोबर दूषके, अवशेष याचेही २०११ चे नियम लागू आहेत. विक्रीवरील प्रतिबंध आणि निर्बंध लागू आहेत. लेबलिंग आणि प्रदर्शन, अन्न सुरक्षा पॅकेजिंग, तसेच जाहिरात आणि दावे याचेही नियम लागू असल्याचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सांगितले.

दूध आणि दुग्धजन्य पदार्थातील भेसळ रोखण्याकरिता २००६, २०११ आणि इतर आठ प्रकारच्या नियमांचे पालन होणे अत्यावश्यक असल्याचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सांगितले. दूध संकलन केंद्र, दूध शीतकरण केंद्र, दुग्ध प्रक्रिया युनिट्स व उत्पादक, पॅकर्स आणि फिलिंग स्टेशन, वितरक, वाहतूकदार, घाऊक विक्रेते, किरकोळ विक्रेते यांना हे नियम लागू असल्याचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सांगितले. यात सुटे दूध विक्रेतेही समाविष्ट असल्याचे त्यांनी म्हटले. दूध संकलन केंद्र, दूध शीतकरण केंद्र, दुग्ध प्रक्रिया युनिट्स व उत्पादक, पॅकर्स आणि फिलिंग स्टेशन, वितरक, वाहतूकदार, घाऊक विक्रेते, किरकोळ विक्रेते यांना हे नियम लागू असल्याचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सांगितले.

## चंद्रपूर-गडचिरोलीत हत्ती-मानव संघर्ष तीव्र, विशेष टास्क फोर्स स्थापन करा- विजय वडेट्टीवार

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- विदर्भातील चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांमध्ये हत्ती आणि मानवामधील संघर्ष अत्यंत तीव्र आणि चिंताजनक बनला आहे. रानटी हत्तींच्या हल्ल्यात आतापर्यंत चार निष्पाप नागरिकांचा जीव गेला असून, या गंभीर मुद्द्यावर आज विधानसभेत काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आक्रमक पवित्रा घेतला. या घटना थांबवण्यासाठी वन विभागाने केवळ जुन्या पद्धती न वापरता तातडीने विशेष टास्क फोर्स स्थापन करावी, अशी आग्रही मागणी वडेट्टीवार यांनी केली. यावर विधानसभा अध्यक्षांनीही सरकारला तातडीने निवेदन करण्याचे निर्देश दिले आहेत.

विजय वडेट्टीवार यांनी सभागृहात २ जुलै रोजी घडलेली एक अत्यंत वेदनादायी घटना निदर्शनास आणून दिली. त्यांच्याच मतदारसंघात येणाऱ्या चंद्रपूर जिल्ह्यातील सावली तालुक्यात, व्याहाड सोनापूर मार्गावर अतुल गोहने (वय ३०) या तरुणाचा रानटी हत्तीच्या हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू झाला. जीव वाचवण्यासाठी अतुलने पळण्याचा प्रयत्न केला, मात्र हत्तीने त्याचा पाठलाग करून त्याला जागीच चिरडले. ही घटना अत्यंत धक्कादायक असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असल्याचे त्यांनी सांगितले.

## आधी दहशतवाद थांबवा; सिंधू जल करारावर पाकिस्ताला भारताचे प्रत्युत्तर

नवी दिल्ली दि.३ (प्रतिनिधी)- पहलगाम दहशवादी हल्ल्यानंतर स्थगित करण्यात आलेल्या सिंधू जल करारावरुन चवथाळलेला पाकिस्तान धमकीचा भाषा बोलू लागला आहे. यावरुन आता भारताने पाकिस्तान प्रत्युत्तर दिले आहे. सिंधू जल करार स्थगित ठेवण्याच्या भूमिकेवर भारत ठाम असल्याचे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी शुक्रवारी स्पष्ट केले. पाकिस्तानकडून दहशतवादाला सातत्याने खतपाणी घातले जात असल्याने हा करार स्थगित असल्याचे जयस्वाल यांनी सांगितले.

"सिंधू जल कराराबाबत भारतीच भूमिक तीच आहे. पाकिस्तानकडून दहशतवादाला सातत्याने खतपाणी घातले जात असल्याने हा करार स्थगित करण्यात आला आहे. पाकिस्तानने दहशतवादासाठी पोषक वातावरण निर्माण करणे सोडून द्यायला हवं", असे रणधीर जयस्वाल म्हणाले. स्थगित करारावरुन पाकिस्तान गेल्या आठवड्यापासून भारताला धमकी देत आहे. पाकिस्तानच्या एका मंत्र्यांने तर "आम्ही त्यांचे हात तोडू" अशी वल्गना केली. पाकिस्तानने उपपंतप्रधान यांनी देखील करारबाबत वक्तव्य केले होते. यानंतर आता भारताने अधिकृतपणे यावर भूमिका स्पष्ट केली आहे.

पाकिस्तानी वृत्तपत्र 'डॉन'नुसार, शेजारील देशाचे पंतप्रधानांकडे नळाची चावी आहे. ते पाकिस्तानमध्ये एक थेंब देखील पाणी येऊ देणार नाहीत, असे वक्तव्य पाकिस्तानचे वातावरण बदल मंत्री मुसादीक मलिक यांनी केले आहे. मलिक यांचे हे वक्तव्य पाकिस्तानमधील अनेक वृत्तवाहिन्यांनी देखील चालवेल शिवाय सोशल मीडियात देखील व्हायरल झाले. पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री इशाक दार यांनी देखील पाकिस्तानच्या वाट्याचे पाणी न मिळाल्यास पाण्यावरुन युद्ध पेटण्याचे भाष्य केले. एवढेच नव्हे तर आसआसच्या प्रदेशातील शांतता आणि सुरक्षेवर प्रश्न निर्माण होतील, असे म्हटल्याचे असोसिएटेड प्रेसच्या वृत्तात म्हटले आहे.

## महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी गुलाबी ई-रिक्षा योजनेला गती-मंत्री आदिती तटकरे

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- राज्यातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या गुलाबी (पिंक) ई-रिक्षा योजनेची अंमलबजावणी अधिक प्रभावी करण्यासाठी शासन प्रयत्नशील असून, चालू आर्थिक वर्षात किमान ५ हजार महिलांना या योजनेचा लाभ देण्याचे उद्दिष्ट असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी विधानपरिषदेत दिली.

राज्यातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी गुलाबी ई-रिक्षा योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबतचा प्रश्न विधानपरिषद सदस्य चित्रा वाघ यांनी मांडला. या चर्चेत सदस्य अभिजित वंजारी, परिणय फुके यांनी सहभाग घेतला. या प्रश्नांना उत्तर देताना त्या बोलत होत्या.

मंत्री तटकरे म्हणाल्या की, पहिल्या टप्प्यातील उद्दिष्ट पूर्ण झाल्यानंतर नगरपरिषदांसह राज्यातील इतर शहरांमध्येही ही योजना विस्तारण्याचा शासनाचा मानस आहे. २०२४ मध्ये प्रायोगिक तत्त्वावर पुणे, नाशिक, (पान ४ वर)

## शाळांच्या परिसरात अपायकारक स्टिंग एनर्जी ड्रिंक व अन्नपदार्थ विक्रीस बंदी; मंत्री नरहरी झिरवाळ यांची विधानसभेत घोषणा

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- शाळांच्या परिसरात विद्यार्थ्यांच्या आरोग्यास अपायकारक ठरणारे अन्नपदार्थ, तसेच स्टिंग एनर्जी सारखी कॅफिनयुक्त पेयांची विक्री करण्यास सरकाने बंदी घातली आहे. अशा पेयांची विक्री होत आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी विधानसभेत दिली.

स्टिंग एनर्जी ड्रिकच्या सेवनामुळे आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांबाबत सदस्य विक्रम पाचपुते यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री झिरवाळ बोलत होते. यावेळी सदस्य राहुल कुल आणि वरुण सरदेसाई यांनीही उपप्रश्न उपस्थित केले.

मंत्री झिरवाळ म्हणाले की, शाळांच्या आवारात व परिसरात बालकांच्या आरोग्यास अपायकारक अन्नपदार्थ आणि कॅफिनयुक्त पेयांची विक्री होऊ नये, यासाठी संबंधित यंत्रणांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. अशा प्रकारची विक्री आढळल्यास त्याची माहिती अन्न व औषध प्रशासनाला देण्याबाबत पालक, शिक्षक, मुख्याध्यापक तसेच जिल्हा परिषदांना सूचित करण्यात आले असून संबंधितांवर कायद्यानुसार कारवाई केली जाईल. राज्यात अन्न व औषधांच्या नमुन्यांच्या तपासणीसाठी सध्या संभाजीनगर, नागपूर आणि मुंबई येथे तीन प्रयोगशाळा कार्यरत आहेत. याशिवाय रायगड, नाशिक, यवतमाळ आणि पुणे येथे नवीन प्रयोगशाळा सुरू करण्यात येणार असून सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्त्वावर आणखी २२ प्रयोगशाळा उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे अन्ननमुने तपासणीची प्रक्रिया अधिक वेगवान होईल, असे मंत्री झिरवाळ यांनी सांगितले.

# जगाला भारावणारी विवेक-वाणी

भगव्या कपड्यातील ते स्वामीजी बोलण्यासाठी व्यासपीठावर उभे राहिले. तो दिवस होता ११ सप्टेंबर १८९३ आणि निमित्त होते अमेरिकेतील शिकागो शहरात भरलेल्या सर्वधर्म परिषदेचे. विविध धर्मांचे प्रतिनिधी जगाच्या कानाकोपऱ्यातून तेथे आले होते. सर्वांनी हातात भाषणे लिहून आणली होती. स्वामीजींच्या हातात मात्र कसलाही कागद नव्हता. त्यांनी क्षणभर डोळे मिटून आपले गुरु रामकृष्ण परमहंस यांचे स्मरण केले आणि धीरगंभीर आवाजात ते बोलू लागले. ''अमेरिकेतील म ाझ्या बंधू भगिनींनो!'' आणि काय आश्चर्य, त्यांच्या या पहिल्याच वाक्याने सभेतील वातावरण भारावून गेले. टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. स्वामीजींनी सर्वांना बंधु - भगिनीच्या नात्याने जोडून घेतले आणि केवळ विश्वबंधुत्वावर भाषण न करता आपल्या शब्दांतून, कृतीतून व भावनेतून ते साकार केले.


त्यांचे हे दोन मिनिटांचे भाषण हा कलाटणी देणारा क्षण होता. हे स्वामीजी म्हणजे ज्यांनी आपल्या विवेक विचाराने आणि वैराग्याने जग जिंकले ते 'स्वामी विवेकानंद' होत. कोलकत्त्यातील प्रसिद्ध वकील विश्वनाथबाबू दत्त व भुवनेश्वरी देवी यांचा वीरेश्वर ऊर्फ नरेंद्र असे नाव असलेला हा मोठा मुलगा. नरेंद्रचा जन्म १२ जानेवारी १८६३ या दिवशी झाला. आई त्यांना प्रेमाने 'बिले' या नावाने हाक मारत.

नरेंद्र शाळेत असतानाची गोष्ट त्यांच्या शाळेतील एका शिक्षकांचा निरोप समारंभ होता. या समारंभाचे अध्यक्ष होते. बंगालमधील ख्यातनाम विद्वान व थोर देशभक्त ईश्वरचंद्र विद्यासागर. त्यांच्यासमोर भाषण कोण करणार हा सर्वांना मोठा प्रश्न पडला होता. तेव्हा ही जबाबदारी नरेंद्रवर सोपविण्यात आली. त्याने खरोखरच सुंदर असे भाषण केले. त्यांच्या भावमधुर शब्द व ओघवत्या वक्तृत्वाने भारावून जाऊन स्वत: ईश्वरचंद्र यांनी त्याची पाठ थोपटली व कौतुक केले.

अशाच एका समारंभामध्ये नरेंद्रला भजन म्हणण्याची संधी मिळाली. त्यांच्या मधुर भजनाने रामकृष्ण भारावून गेले. दोघांची भेट झाली. नरेंद्रला रामकृष्ण यांच्या सारखे गुरु आणि रामकृष्णांना शिष्य मिळाला. या महान गुरु शिष्यांच्या अनेक कथा प्रसिद्ध आहेत. रामकृष्णांच्या पश्चात त्यांचा वारसा चालवीत स्वामीजींनी भारतभ्रमण केले. खेतडीस या संस्थानचे राजे महाराज अजितसिंह यांनी त्यांना 'स्वामी विवेकानंद' हे नाव दिले. याच स्वामी विवेकानंदांनी आपल्या ओजस्वी वक्तृत्वाने जग जिंकले. त्यांच्या वक्तृत्वात विचारांचा ठामपणा असे आणि त्या विचारांना आचरणाचा पाया असे. त्यामुळे लोक त्यांचे भाषण तळमळीने, मंत्रमुग्ध होऊन ऐकत असत.

लहानपणी त्यांच्या वडिलांनी 'तू मोठेपणी कोण होणार?' असे विचारले तेव्हा नरेंद्रने उत्तरे दिले, मी गाडीवान होणार', हे ऐकून वडील नाराज झाले मात्र त्यांची आई म्हणाली, 'बेटा नरेंद्र फारच छान ! तू गाडीवान हो, पण... कृष्णासारखा सारथी हो अर्जुनाच्या रथाचे घोडे हाकताना त्याने जसे ज्ञान दिले, तसंच तूही कर. आपल्या आईचा हा आशीर्वाद त्यांनी पुढील आयुष्यात सार्थ करुन दाखविला.' भारताविषयी आणि हिंदू धम ीविषयी त्यांच्या मनात अतोनात आदर होता. आपल्या देशाच्या उद्धाराचा ते सतत विचार करत. अमेरिका, युरोपातील देशांचा दौरा संपल्यावर स्वामीजी भारतात यायला निघाले. तेव्हा त्यांच्या एका ब्रिटीश मित्राने त्यांना विचारले. गेली चार वर्ष आपण पाश्चात्य देशांतील ऐश्वर्यसंपन्न असं आयुष्य अनुभवले. आता आपल्याला भारतात परतताना कसं वाटतं? तेव्हा स्वामीजींनी तत्काळ उत्तर दिले. 'मी येण्यापूर्वी माझं भारतावर खूप प्रेम होते. आता तर भारतातील धुळीचा प्रत्येक कण, तिथली हवा मला पवित्र वाटत आहे.' स्वामी विवेकानंदाच्या विवेकवाणीने भारतीयांबरोबर पाश्चात्यांचेही विचार विश्व पालटले. मी तुमच्यासाठी काय करु असे त्यांना कोणी विचारले तर ते म्हणत 'माझ्या देशावर प्रेम कर ! भगिनी निवेदिता, रॉकफेलर, जोसेफाईन मॅकलिऑड यासारख्या अनेकांचे आयुष्य स्वामीजींच्या सान्निध्यात बदलून गेले. आपले जीवनकार्य संपले आहे असे वाटल्यावर ४ जुलै १९०२ रोजी बेलूर येथील मठामध्ये स्वामी विवेकानंद पंचत्वात विलीन झाले. आज विवेकानंद यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या पावनस्मृतीस विनम्र अभिवादन!

# स्वामी विवेकानंद : शिकागो जागतिक धर्मपरिषदेत हिंदू धर्माचा परिचय दाते!



विवेकानंद हे त्यांच्या समकालीन भारतातील सर्वात प्रभावशाली तत्त्वज्ञ आणि समाजसुधारकांपैकी एक होते. तसेच ते पाश्चात्य जगाम ध्ये वेदांताचे सर्वात यशस्वी मिशनरी होते. समकालीन हिंदू सुधारणा चळवळींमध्येही ते एक प्रमुख शक्ती होते आणि त्यांनी वसाहतवादी भारतातील राष्ट्रवादाच्या संकल्पनेत योगदान दिले. आधुनिक भारतातील सर्वात प्रभावशाली व्यक्ती आणि देशभक्त संत म्हणून त्यांना आता व्यापकपणे ओळखले जाते. त्यांचा जन्मदिवस भारतात राष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा केला जातो. संतचरणधूळ: श्रीकृष्णदास (बापू) निरंकारीजींचा सदर बोधप्रद संकलित लेख अभ्यासा.... संपादक.

**स्वामी विवेकानंद** (१२ जानेवारी १८६३- ४ जुलै १९०२; नरेंद्रनाथ दत्त) हे एक भारतीय संन्यासी आणि तत्त्वज्ञ होते. रामकृष्ण परमहंस यांचे ते शिष्य होते. ते पाश्चात्य गूढवादाने प्रभावित झाले. तसेच त्यांनी पाश्चात्य जगाला वेदांत आणि योगाच्या भारतीय दर्शनांचा (शिकवण, पद्धती) परिचय करून देण्यात प्रमुख भूमिका निभावली. स्वामी विवेकानंदजींचे तत्त्वविचार आणि शिकवण- गुरू रामकृष्ण परमहंस हे हिंदू तत्त्वज्ञानाच्या वेदान्त शाखेचे पुरस्कर्ते होते. आद्य शंकराचार्य यांच्या विचारांना पुढे नेत त्यांनी हे तत्त्वज्ञान प्रतिपादित केले. त्यांच्या मते सर्व प्राणिमात्र शिवाचे अंश आहेत, त्यामुळेच शिवभावे जीवसेवा हे रामकृष्ण यांचे वचन त्यांनी शिरोधार्य मानले. प्रत्येक जीव हा मूळ रूपातच ईश्वरी- दैवी आहे. अंतर्गत आणि बाह्य स्वभावावर नियंत्रण मिळवून त्याच्यातील दैवी अंशास जागृत करणे, हे आपले ध्येय आहे. कर्म, पूजा, मानसिक नियंत्रण किंवा तत्त्वज्ञान यापैकी एक किंवा अनेक मार्गांचा उपयोग करून मुक्ती मिळवली पाहिजे. उठा, जागे व्हा, आणि आपले ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका.

दरिद्री नारायण हा शब्द विवेकानंदानी जगाला दिला. त्यांचा बंगाली कवितेतील अंश-

'बहुरुपे सम्मुखे तोमार छाडिं
कोथाय खूंजिछो ईश्वरें
जीवे प्रेम करे जेई जनें
सेई जन सेविछे ईश्वरें'

अर्थ- ईश्वर अनेक रूपाने तुझ्या समोर उभा आहे. ते सोडून तू कुठे ईश्वराला शोधतोस? जे कोणी प्राणिमात्रांवर प्रेम करतात, तेच ईश्वराची खरी सेवा करतात. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात हिंदू धर्माला प्रमुख जागतिक धर्माच्या दर्जात आणून आंतरधर्मीय जागरूकता वाढवण्याचे श्रेय विवेकानंदांना दिले जाते. भारतातील हिंदू सुधारणा चळवळींमध्ये ते प्रमुख होते. त्यांनी ब्रिटिशशासित भारतात राष्ट्रवाद आणण्यात योगदान दिले. स्वामी विवेकानंदांनी राम कृष्ण मठ आणि रामकृष्ण मिशनची स्थापना केली. 'माझ्या अमेरिकेच्या बहिणी आणि बंधूंनो...', या शब्दांनी सुरू झालेल्या त्यांच्या भाषणासाठी ते फार प्रसिद्ध आहेत. ज्यामध्ये त्यांनी सन १८९३मध्ये शिकागो येथील जागतिक धर्माच्या परिषदेत हिंदू धर्माचा परिचय दिला.

उत्तर कोलकत्ता सिमलापल्ली येथे दि.१२ जानेवारी १८६३ सोमवारी सकाळी ६:३२ वा. पौष कृष्ण सप्तमी, संक्रांतीच्या दिवशी विवेकानंदांचा जन्म झाला. त्यांचे नाव नरेंद्र ठेवण्यात आले. वडील विश्वनाथ दत्त हे कोलकाता उच्च न्यायालयात वकीलाचे ॲटर्नी होते. ते सामाजिक आणि धार्मिक बाबीत पुरोगामी विचाराचे आणि दयाळू स्वभावाचे होते. वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, भगवतगीता आदि धार्मिक साहित्यात त्याने विशेष आवड दाखवली. किशोरावस्थेपासूनच ते व्यायाम, खेळ आदी उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत. त्यांना वाचन, व्यायाम, कुस्ती, मुष्टियुद्ध, पोहणे, होडी वल्हवणे, घोडेस्वारी, लाठियुद्ध, गायन आणि वादन इत्यादी छंद होते. नरेंद्रनाथांनी आपल्या घरीच शिक्षणाची सुरुवात केली. नंतर त्यांनी सन १८७१ साली ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या मेट्रोपॉलिटन इन्स्टिट्यूशनम ध्ये प्रवेश घेतला. ते सन १८७९मध्ये प्रेसिडेन्सी कॉलेजची प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाले. काही दिवस या संस्थेत राहिल्यानंतर पुढे त्यांनी जनरल असेम्ब्लीज इन्स्टिट्यूशनमध्ये प्रवेश घेतला. येथे त्यांनी तर्कशास्त्र, पाश्चात्त्य तत्त्वज्ञान, आणि युरोपचा इतिहास यांचा अभ्यास केला. सन १८८१ साली ते फाइन आर्टची आणि सन १८८४मध्ये बीएची परीक्षा उत्तीर्ण झाले. नरेंद्रनाथांनी डेविड ह्युम, इम्यानुल कँट, गोत्तिलेब फित्शे, बारूच स्पिनोझा, जॉर्ज हेगेल, आर्थर शोपेनहायर, ऑगस्ट कोम्ट, हर्बट स्पेंसर,जॉन स्टुअर्ट मिल आणि चार्ल्स डार्विन इत्यादी विचारवंतांच्या लेखनाचा अभ्यास केला होता. हर्बर्ट स्पेन्सरच्या उत्क्रांतिवादाने ते प्रभावित झाले होते. गुरुदास चटोपाध्याय या बंगाली प्रकाशकासाठी त्यांनी स्पेन्सरच्या 'एज्युकेशन' या पुस्तकाचा अनुवादही केला होता. काही काळ त्यांनी स्पेन्सर यांच्याशी संपर्कही स्थापन केला होता. पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाच्या अभ्यासासोबत त्यांनी प्राचीन संस्कृत आणि बंगाली ग्रंथांचाही गाढ अभ्यास केला होता. त्यांच्या प्राध्यापकांच्या मते नरेंद्र एक प्रतिभावान विद्यार्थी होते. १८८१-८४ मध्ये ते जेथे शिकले त्या स्कॉटिश चर्च कॉलेजचे प्राचार्य डॉ.विल्यम हेस्टी यांनी म्हटले आहे की, 'नरेंद्र खरोखरच बुद्धिमान आहे. मी खूप फिरलो, जग पाहिले, परंतु त्याच्यासारखी प्रतिभा आणि बुद्धिसामर्थ्य असलेला मुलगा अगदी जर्मन विद्यापीठातल्या तत्त्वज्ञानाच्या विद्यार्थ्यांमध्येही मला बघायला मिळाला नाही.' त्यांना श्रुतिधारा- विलक्षण स्मरणशक्ती असलेला म्हटले जात असे. ङ्गएवढ्या तरुण मुलाने एवढे वाचले असेल, असे मला वाटले नव्हते.ङ्ख असे महेंद्रलाल सरकारांनी त्यांच्याशी चर्चा केल्यावर म्हटले होते.

कोलकात्यात शिमला नामक मोहल्लयात सुरेंद्रनाथ मित्र यांनी रामकृष्ण परमहंस यांना आपल्या घरी एका समारंभासाठी बोलविले होते. त्यावेळी कुणी चांगला गायक न मिळू शकल्याने त्यांना आपल्या शेजारी राहणाऱ्या नरेंद्रला बोलावून आणले. इ.स. १८८१ च्या नोव्हेंबर महिन्यात श्री रामकृष्ण पहिल्यांदाच नरेंद्रला भेटले आणि त्याचे गायन ऐकून संतुष्ट झाले. त्यांनी त्याला दक्षिणेश्वर येथे येण्याचे आमंत्रण दिले. सूक्ष्म योगदृष्टीच्या साहाय्याने श्रीरामकृष्ण नरेंद्रनाथांचा महिमामय अति उज्ज्वल भावी काल पाहू शकले होते म्हणूनच ते नरेंद्राकडे आकृष्ट झाले, असे दिसते.

अनन्यचित्त होऊन गुरूने सांगितलेल्या म ार्गाने साधना करीत नरेंद्र उन्नती साधत होता. रामकृष्णांच्या पवित्र सहवासात नरेंद्रात आमूलाग्र बदल झाले. त्यांच्यासह असलेल्या अन्य तरुण साधकांनी रामकृष्णांच्या आदर्शांना स्वीकारून काशीपूरच्या उद्यानात तपश्चर्या केली. रामकृष्णांच्या सेवेत हे सर्व तरुण सतत राहिल्याने त्या सर्वांच्यात अपूर्व आध्यात्मिक प्रेमसंबंध जोपासले गेले. येथे या ठिकाणीच भावी 'रामकृष्ण संघाची' पायाभरणी झाली. याच ठिकाणी एका शुभ दिवशी रामकृष्ण यांनी आपल्या यास सर्व शिष्यांना भगवी वस्त्रे देऊन संन्यासदीक्षा दिली. संन्यासग्रहणानंतर गतकालीन युगप्रवर्तक संन्यासी मंडळींचे जीवन आणि उपदेश यांचे अनुशीलन करणे हेच नरेंद्राचे लक्ष्य बनले. नरेंद्राच्या घरी लहानाचे मोठे झालेले त्यांचे नातेवाईक डॉ. रामचंद्र दत्त हे रामकृष्णांचे भक्त होते. धर्मभावनेने प्रेरित होऊन नरेंद्राच्या मनात लहानपणीच तीव्र वैराग्य उत्पन्न झालेले पाहून डॉ. दत्त एकदा त्यांना म्हणाले, 'भाई, धर्मलाभ हेच जर तुझ्या जीवनाचे उद्दिष्ट असेल, तर तू ब्राह्मोसमाज वगैरेंच्या भानगडीत पडू नकोस. तू दक्षिणेश्वरीला श्रीरामकृष्णांकडे जा.' एके दिवशी त्यांचे शेजारी सुरेंद्रनाथ यांच्याकडेच रामकृष्ण परमहंसांचे त्यांना दर्शन झाले. सुरुवातीचे काही दिवस रामकृष्ण नरेंद्रनाथांना आपल्यापासून क्षणभरही दूर ठेवू इच्छित नसत. त्यांना जवळ बसवून अनेक उपदेश करत. ते दोघेच असतांना त्यांची आपापसांत खूप चर्चा होत असे. रामकृष्ण त्यांच्या अपूर्ण राहिलेल्या कार्याचा भार नरेंद्रनाथांवर सोपवणार होते. एके दिवशी राम कृष्णांनी एका कागदाच्या कपट्यावर लिहिले, 'नरेंद्र लोकशिक्षणाचे कार्य करील.' काहीसे आढेवेढे घेत नरेंद्रनाथ त्यांना म्हणाले, 'हे सारे माझ्याने होणार नाही.' रामकृष्ण त्यांना लगेच दृढपणे म्हणाले, होणार नाही? अरे तुझी हाडं हे काम करतील. पुढे रामकृष्णांनी नरेंद्रनाथांना संन्यासदीक्षा देऊन त्यांचे नामकरण स्वामी विवेकानंद असे केले.

रामकृष्ण मठाची स्थापना श्री राम कृष्णांच्या महासमाधीनंतर स्वामी विवेकानंदांनी आपले एक गुरुबंधू तारकनाथ यांच्या मदतीने कोलकात्याजवळील वराहनगर या भागात एक पडक्या इमारतीत मठाची स्थापना केली. तत्पूर्वी त्या जागेत भुतांचा वावर आहे, असा लोकप्रवाद होता. विवेकानंदांनी रामकृष्णांनी वापरलेल्या वस्तू आणि त्यांच्या भस्मास्थींचा कलश त्या ठिकाणी नेऊन ठेवला आणि त्यांचे भक्त तेथे राहू लागले. स्वामी विवेकानंद हे त्यांच्या समकालीन भारतातील सर्वात प्रभावशाली तत्त्वज्ञ आणि समाजसुधारकांपैकी एक होते आणि पाश्चात्य जगामध्ये वेदांताचे सर्वात यशस्वी मिशनरी होते. समकालीन हिंदू सुधारणा चळवळींमध्येही ते एक प्रमुख शक्ती होते आणि त्यांनी वसाहतवादी भारतातील राष्ट्रवादाच्या संकल्पनेत योगदान दिले. आधुनिक भारतातील सर्वात प्रभावशाली व्यक्ती आणि देशभक्त संत म्हणून त्यांना आता व्यापकपणे ओळखले जाते. त्यांचा जन्मदिवस भारतात राष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा केला जातो.

गुरू रामकृष्णजींच्या समाधीनंतर स्वामी विवेकानंद भारत भ्रमण करण्यास बाहेर पडले. अखेरीस ते कन्याकुमारी या भारताच्या दक्षिण टोकाला जाऊन पोहोचले. तेव्हा त्यांनी समुद्रात उडी मारली आणि शिलाखंडावर जाऊन ध्यानात बसले. त्यावेळी भारतातील दैन्य पाहून त्यांचे कासावीस झालेले मन अधिकच हळवे झाले. भारताच्या कल्याणासाठी, येथील जनतेच्या उद्धारासाठी आयुष्य समर्पित करणे आणि त्यासाठी या मातृभूमीचा सेवक बनून झटणे, असा दृढ संकल्प स्वामीजींनी केला. अद्वैत वेदान्त विचार जगभरात पोचविणे आणि माणसातील सुप्त म नुष्यत्व जागे करणे, यासाठी त्यांनी भारताच्या सीमा ओलांडून पाश्चिमात्य जगात जाण्याचेही ठरविले. पुढे शुक्रवार दि.४ जुलै १९०२ या दिवशी त्यांनी कोलकात्याजवळील बेलूर मठात समाधी घेतली. समाधी घेण्याच्या दिवशी त्यांनी पहाटे बेलूर मठात परिव्राजकांना शुक्ल यजुर्वेदाचा पाठ शिकवला आणि स्वामी प्रेमानंद या गुरुबंधूंसमवेत काही काळ फिरत असताना त्यांना रामकृष्ण मठाच्या भविष्यासंबंधात काही सूचना केल्या. ध्यान करत असतांना रात्री नऊ वाजून दहा मिनिटांनी त्यांनी सम ाधी घेतली आणि चाळीस वर्षापर्यंत जगणार नाही, ही स्वत:ची भविष्यवाणी खरी केली. कन्याकुमारी येथे समुद्रात काही अंतरावर त्यांचे विवेकानंद स्म ारक विवेकानंद केंद्र या संस्थेच्या पुढाकाराने उभे राहिले आहे आहे.

!! संतशिरोमणी स्वामी विवेकानंदजींना त्यांच्या पावन समाधीदिनी करोडो विनम्र अभिवादन !!

- संकलन व सुलेखन -

**संतचरणधूळ: श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी.**

# महाकर्जमुक्ती योजनेतील लाभार्थी शेतकऱ्यांना दिलासा; लाभ मिळेपर्यंत व्याज आकारू नये; शासन निर्णय निर्गमित

छत्रपती संभाजीनगर, दि.३ (प्रतिनिधी) - राज्य शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना आणखी एक मोठा दिलासा देण्यात आला आहे. योजनेचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईपर्यंत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका तसेच विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी पात्र थकीत पीककर्जाच्या रकमेवर कोणत्याही प्रकारची व्याज आकारणी करू नये, असे स्पष्ट आदेश सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने जारी केले आहेत.

मंत्रिमंडळाने मंजूर केलेल्या कर्जमुक्ती योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. शासन निर्णयानुसार ३० जून २०२५ रोजी थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली पात्र पीककर्जे या योजनेसाठी ग्राह्य धरण्यात आली आहेत. अशा पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार असून, दोन लाख रुपयांपेक्षा अधिक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर एकवेळ समाझोता योजनेचा लाभ मिळणार आहे. तसेच नियमित पीककर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे.

या योजनेत अल्पमुदतीची पीककर्जे तसेच पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित पीककर्जांचाही समावेश करण्यात आला आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी मानक कार्यपद्धती (SOP) निश्चित करण्यात आली असून, पात्र कर्जखात्यांची माहिती संगणकीय प्रणालीवर अपलोड करणे, कर्जखात्यांचे पडताळणीकरण, आधार प्रमाणीकरण आणि त्यानंतर कर्जमाफीची रक्कम संबंधित कर्जखात्यात हस्तांतरित करण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. शासनाने नमूद केले आहे की, ही संपूर्ण प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी काही कालावधी लागणार आहे. त्यामुळे कर्जमाफीची रक्कम प्रत्यक्ष खात्यात जमा होण्यापूर्वी शेतकऱ्यांच्या कर्जावर व्याज आकारल्यास त्यांच्यावर अतिरिक्त आर्थिक भार पडू शकतो. हे लक्षात घेऊन पात्र शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी लाभ मिळेपर्यंत थकीत पीककर्जाच्या रकमेवर व्याज आकारणी न करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या आदेशामुळे पात्र शेतकऱ्यांच्या थकबाकीत अनावश्यक वाढ होणार नसून, कर्जमुक्तीनंतर त्यांना नव्याने पीककर्ज उपलब्ध होण्याचाही मार्ग अधिक सुलभ होणार आहे. कर्जमुक्ती योजनेची पारदर्शक आणि परिणामकारक अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी या आदेशाची तातडीने अंम लबजावणी करावी, असे शासनाने आदेशात स्पष्ट केले आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७९अ अंतर्गत लोकहिताच्या दृष्टीने हा आदेश जारी करण्यात आला असून, योजनेतील कर्जमुक्ती व एकवेळ समजोता योजनेस पात्र असलेल्या शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळेपर्यंत पात्र थकीत कर्जावर व्याज आकारणी न करण्याचे निर्देश सर्व संबंधित यंत्रणांना देण्यात आले आहेत.

# जिल्हा परिषद उपकरातून दिव्यांगांना वैयक्तिक लाभ

छत्रपती संभाजीनगर, दि.३ (प्रतिनिधी) - जिल्हा परिषदेच्या उपकर निधीतून राबविण्यात येणाऱ्या दिव्यांग कल्याण योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांकडून दि.३१ जुलै पर्यंत प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. ग्रामिण भागातील रहिवासी असलेल्या दिव्यांग व्यक्तिंनी या योजनेचा लाभ घ्यावा,असे आवाहन सहा. आयुक्त दिव्यांग सक्षमीकरण बाबासाहेब अरवत यांनी केले आहे.

जिल्हा परिषदेच्या उपकरातून ५ टक्के निधी हा दिव्यांग कल्याणासाठी राखीव ठेवला जातो. या उपकर निधीतून सन २०२६-२७ करीता दिव्यांगांना वैयक्तिक लाभ देण्यात येणार आहे. ग्रामिण भागातील लाभार्थ्यांना हा लाभ देण्यात येणार असून १०० टक्के शासकीय अनुदान तत्त्वावर या योजना राबविण्यात येतात. त्यासाठी ग्रामिण भागातील रहिवासी असलेल्या पात्र लाभार्थ्यांकडून दि.३१ जुलै पर्यंत प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. उपकर निधीतून दिव्यांग व्यक्तिंना विनाअट घरकूल देणे, निराधार/ निराश्रीत अतितीव्र दिव्यांगांना विनाअट निर्वाह भत्ता देणे, अस्थिव्यंग व्यक्तिंना स्वयंचलित तीन चाकी सायकल (स्कूटर विथ ॲडाप्शन) डिव्हायसेस फॉर डेली लिव्हिंग, दिव्यांग व्यक्तिंचा बचत गटांना अनिदान देणे अशा योजना राबविल्या जातात.

आवश्यक कागदपत्रे- ४० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक दिव्यांगत्व असल्याचे युडीआयडी प्रमाणपत्र, तहसिलदार यांनी दिलेले अधिवास/रहिवासी प्रमाणपत्र, यापूर्वी लाभ न घेतल्याचे प्रमाणपत्र, आधार कार्ड झेरॉक्स, घरकुलासाठी ८ अ चा उतारा, तहसिलदार यांनी दिलेला वार्षिक उत्पन्नाचा दाखला, स्कूटर विथ ॲडाप्शन साठी परिवहन अधिकारी यांचा परवाना/ अर्हक प्रमाणपत्र, बचत गटासाठी लाभ घ्यावयाचा असल्यास बचतगट नोंदणी प्रमाणपत्र (जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा किंवा महिला आर्थिक विकास महामंडळाने दिलेले.) ग्रामिण भागातील रहिवासी असलेल्या दिव्यांग व्यक्तिंनी या योजनेचा लाभ घ्यावा,असे आवाहन सहा.आयुक्त दिव्यांग सक्षमीकरण बाबासाहेब अरवत यांनी केले आहे.

# जम्मू-काश्मीरमध्ये सीआरपीएफचे वाहन उलटले; सहा जवान जखमी

श्रीनगर : जम्मू-काश्मीरमधील गांदरबल जिल्ह्यात शुक्रवारी सकाळी झालेल्या अपघातात केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (सीआरपीएफ) वाहनाला अपघात होऊन सहा जवान जखमी झाले. श्रीनगर-लेह राष्ट्रीय महामार्गावरील सोनमर्ग (गगनगीर) बोगद्याजवळ हा अपघात घडला.

प्राथमिक माहितीनुसार, वाहनावरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने ते रस्त्यावरून घसरून उलटले. अपघातात वाहनातील सहा सीआरपीएफ जवान जखमी झाले. घटनेची माहिती मि ळताच बचाव पथके तातडीने घटनास्थळी दाखल झाली आणि मदतकार्य सुरू करण्यात आले.

जखमी जवानांवर घटनास्थळी प्राथमिक उपचार करण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी त्यांना गुंड येथील सीआरपीएफ छावणीत तसेच जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू आहेत.या अपघाताची स्थानिक पोलिसांनी नोंद घेतली असून, नेमके कारण काय होते याचा तपास सुरू करण्यात आला आहे. अपघातामागील कारणांचा शोध घेण्यासाठी संबंधित यंत्रणा सखोल चौकशी करत असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

# वन महोत्सव: ५ लाख २५ हजार रोपे सवलतीच्या दरात विक्रीसाठी उपलब्ध

छत्रपती संभाजीनगर, दि.३ (प्रतिनिधी)- सामाजिक वनीकरण विभागामार्फत दि.१५ जून ते ३० सप्टेंबर या कालावधीत वन महोत्सव राबविण्यात येतो. या कालावधीत नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर रोपांची लागवड करावी यासाठी जिल्ह्यातील रोप वाटिकांमध्ये स्वस्त दरात ५ लक्ष २५ हजार रोपे उपलब्ध करुन देण्यात आले आहेत, अशी माहिती सामाजिक वनीकरण विभागाचे विभागीय वन अधिकारी संदीप गिरी यांनी दिली आहे.

याबाबत सामाजिक वनीकरण विभागाकडून प्राप्त माहितीनुसार, ९ महिने वयाच्या सर्वसाधारण प्रजातीची रोपे अ,ब आणि क अशा वर्गवारीत उपलब्ध आहेत. अ वर्ग रोपांचा दर १८ रुप्ये प्रति रोप, तर ब वर्ग-११ रुपये, क वर्ग ८ रुपये प्रमाणे उपलब्ध आहेत. हे दर एरवीच्या दरांपेक्षा निम्मे वा



त्यापेक्षाही कमी आहेत.

विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण यांच्या अखत्यारीतील रोपवाटिकांमध्ये रोपांची उपलब्धता व संपर्क अधिकाऱ्याचे नाव क्रमांक याप्रमाणे-

सावंगी ता. छत्रपती संभाजीनगर- रोपांची संख्या १ लाख ८० हजार, संपर्क अधिकारी- समीर इनामदार-९८६९१६०४०५

वैजापूर रोपवाटिका (चर्च, आयटीआय)- रोपांची संख्या १ लाख ७२ हजार ५००, संपर्क- यु.एच. चिकटे-९४२३४१७२९५.

पैठण(कातपुर)-रोपांची संख्या १ लाख ७२ हजार ५००, संपर्क जी.एस. सातपुते-९४२३४१७०८६.

असे एकूण ५ लाख २५ हजार रोपांची उपलब्धता करण्यात आली आहे.

या शिवाय वन महोत्सव कालावधीसाठी जिल्ह्यात ठिकठिकाणी रोप विक्री केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. या केंद्रांची माहिती याप्रमाणे-

जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर- संपर्क समीर इनामदार-९८६९१६०४०५.

सार्वजनिक बांधकाम विभाग, फुलंब्री-श्रीमती पी.ए. काळे-९६५७२८१०५६.

तहसिल कार्यालय, सिल्लोड-ए.टी. पाटील-८८८८९७९०५५.

तहसिल कार्यालय, सोयगाव-एन.डी. काळे-९४०४६८०७७६.

तहसिल कार्याल, वैजापूर- यु.एच. चिकटे-९४२३४१७२९५.

पंचायत समिती कार्यालय, कन्नड-ए.एम. काटकर-९४२१६८५५५७.

पंचायत समिती कार्यालय, खुलताबाद-आर. डी. वलथरे-९७६४७४११७३.

पंचायत समिती कार्यालय, गंगापूर-ए.बी. गायके-७५८८५३८२०४.

पंचायत समिती कार्यालय, पैठण-जी.एस. सातपुते-९४२३४१७०८६.

या सर्व नागरिक, सामाजिक संस्था, शासकीय कार्यालये आदिंनी रोप उपलब्ध करुन घ्यावे व लागवड करावी,असे आवाहन विभागीय वन अधिकारी संदीप गिरी यांनी केले आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६

# सिंधुदुर्गात ५,११८ कर्जखात्यांची तपासणी पूर्ण शेतकऱ्यांनी ऑनलाइन आधार प्रमाणीकरण करण्याचे आवाहन

सिंधुदुर्गनगरी, दि. २ (प्रतिनिधी) – राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत सिंधुदुर्ग जिल्ह्यात पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांची माहिती शासनाच्या पोर्टलवर अपलोड करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली असून, विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्था व सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती बँकेतील एकूण ५ हजार ११८ कर्जखात्यांची तपासणी पूर्ण करण्यात आली आहे. त्यापैकी ४ हजार ८ कर्जखाती पात्र ठरली असून, आतापर्यंत ३ हजार ९५६ खात्यांची माहिती पोर्टलवर अपलोड करण्यात आली असल्याची माहिती ही माहिती सहायक निबंधक सुनिल मरभळ यांनी दिली.

योजनेच्या अंमलबजावणीसाठी विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्था तसेच जिल्हा मध्यवर्ती बँकेतील थकबाकीदार शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांची माहिती शासकीय लेखापरीक्षकांमार्फत तपासण्यात आली. या तपासणीनंतर पात्र ठरलेल्या कर्जखात्यांची माहिती शासनाने उपलब्ध करून दिलेल्या विशेष पोर्टलवर अपलोड करण्याचे काम सुरू आहे. दरम्यान, राष्ट्रीयीकृत, व्यापारी आणि ग्रामीण बँकांमधील कर्जखात्यांची माहिती संबंधित बँकांच्या प्रधान कार्यालयांकडून शासनाच्या पोर्टलवर अपलोड करण्याची प्रक्रिया स्वतंत्रपणे राबविण्यात येत आहे.

बँकांकडून माहिती अपलोड झाल्यानंतर शासनाकडून संगणकीय प्रणालीद्वारे सर्व माहितीची पडताळणी करण्यात येणार आहे. त्यानंतर आधार प्रमाणीकरणासाठी पात्र ठरलेल्या कर्जदारांची यादी पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात येईल. या याद्या निबंधक कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती बँक, विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्था तसेच स्थानिक स्तरावर प्रसिद्ध केल्या जाणार आहेत.

पात्र लाभार्थी शेतकऱ्यांनी शासनाने प्रसिद्ध केलेल्या यादीनुसार सेवा सुविधा केंद्रामार्फत ऑनलाइन आधार प्रमाणीकरण करून घेणे आवश्यक आहे. आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतरच योजनेअंतर्गत पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याने पात्र शेतकऱ्यांनी संबंधित सूचनांकडे लक्ष देऊन आवश्यक प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांचे शेतीविषयक धोरण आणि महाराष्ट्र शासनाची शेतकरी कर्जमुक्ती योजना

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी आपला राज्यकारभार करतांना शेतकरी हा राज्याचा आधारस्तंभ मानला होता. त्यादृष्टिनेच शेतीविषयक धोरणे आखली व राबविली. विद्यमान महाराष्ट्र शासनही त्यांचीच धोरणांचा अंगिकार करीत आहे. शेतकरी हा राज्याचा आधारस्तंभ मानून शेतकऱ्याला कर्जमुक्त करण्याची योजना शासन राबवित आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मत्रिशताब्दीनिमित्त होत असलेली शेतकऱ्यांची कर्जमुक्ती हीच खरी आदरांजली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ह्या तत्कालिन राजकारणातील एक महत्त्वाच्या महिला राजकारणी, कुशल प्रशासक आणि प्रजाहितदक्ष राज्यकर्त्या होत्या. आपल्या राज्यकारभाराचा त्यांनी आदर्श परिपाठ घालून दिला.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या त्यांच्या धार्मिक वृत्ती, दानशूरपणा यासाठी विशेषकरुन ओळखल्या जातात. त्यांची राज्यकारभारावर पकड होतीच पण त्या जनतेचे सुख दुःख जाणून होत्या. म्हणूनच त्यांचे शेती आणि शेतकरी विषयक धोरण मुद्दाम अभ्यासण्याजोगे आहे.

अहिल्यादेवींचा जन्म ३१ मे १७२५ रोजी चोंडी जि. अहिल्यानगर येथे झाला. माणकोजी शिंदे हे त्यांचे वडील तर सुशिलाबाई ह्या त्यांच्या आई. तत्कालीन चालीरितींप्रमाणे त्यांचा विवाह वयाच्या आठव्या वर्षी सुभेदार मल्हारराव होळकर यांचे चिरंजीव खंडेराव ह्यांच्याशी झाला. वयाच्या २८ व्या वर्षी अहिल्यादेवींना वैधव्याला सामोरे जावे लागले. त्यावेळच्या प्रथेप्रमाणे त्या सती जायला निघाल्या मात्र त्यांचे सासरे मल्हारराव यांनी त्यांना मनाई केली.

मल्हारराव होळकरांकडे इंदूरच्या संस्थानाची जहागिरी होती. मल्हारराव यांच्या निधनानंतर संपूर्ण कारभार हा अहिल्यादेवी पहात असत. तब्बल २८ वर्षे त्यांनी संस्थानाचा कारभार सांभाळला. राज्यातील सर्व समाज घटकांना सोबत घेऊन सर्व घटकांचा विकास करत सर्व घटकांना विकास प्रक्रियेत सहभागी करुन घेत आपल्या राज्याचा उत्कर्ष त्यांनी साधला.

ही एक बाई काय राज्य कारभार करणार? ही दरबारी मंडळींची अटकळ त्यांनी सपशेल खोटी ठरविली. अहिल्यादेवी एक चाणाक्ष आणि सुधारणावादी कारभारी होत्या. पूर्वीच्या कायद्यांमध्ये त्यांनी परिस्थितीनुसार सुधारणा केल्या. करपद्धती सौम्य केली .जमीन करार-पट्ट्याने देण्याची पद्धत सुरू केली. राजधानी इंदूरहून नर्मदातीरी महेश्वरला हलविली. महेश्वरला विणकरांची वसाहत करुन वस्त्रोद्योगास उत्तेजन दिले.

**अहिल्यादेवींचे शेती विषयक धोरण**

शेतकरी हा राज्याचा आधारस्तंभ असतो हे अहिल्यादेवींच्या विचाराचे सूत्र होते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हिताचेच कायदे त्यांनी केले. राज्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली की शेतसारा माफ करावा,असा नियम त्यांनी केला. गरीब भूमिहीन शेतकऱ्यांना त्यांनी मालकी हक्काने जमिनी दिल्या. त्या जमिनीत शेतकऱ्याने फळझाडे लावावी. त्यात ९ झाडे मालकाने स्वतःसाठी तर ११ झाडे शासनासाठी ठेवावी असा नियम केला. यामुळे जमिनी लागवडीखाली आल्या व त्यांचा पोत सुधारला. नद्यांचे पाणी शेतीसाठी वळवण्यासाठी त्यांनी अनेक ठिकाणी बांध बांधले. तलाव केले.

शेतकऱ्यांना शेतसारा त्यांच्या उत्पन्नाप्रमाणे आकारावा असा नियम केला. कर सौम्य केले. पर्यावरणाची आणि प्राणिमात्रांच्या संवर्धनाची उत्तम जाण असलेल्या अहिल्यादेवींनी आपल्या राज्यात काही शेते ही पशुपक्षांसाठी राखीव ठेवण्यास सुरुवात केली. अशा शेतांमध्ये पशुपक्षांना मुक्त प्रवेश असे. विशेष म्हणजे अशा शेताच्या मालकांना शेताच्या उत्पादना इतकी रक्कम मोबदला म्हणून शासनातर्फे दिली जाई. थोडक्यात शेतकऱ्याला आर्थिक झळ बसू देत नसत.

अहिल्यादेवींच्या राज्यात शेतकऱ्यांना आपले उत्पादन सोईनुसार कुठेही विकण्याची मुभा होती. त्यामुळे योग्य भाव मिळे व शेतकऱ्याची आर्थिक स्थिती चांगली राही. थोडक्यात शेतकरी सुखी समाधानी होता. शेती मालाला पुरक व्यवसाय, शेतमालावरील प्रक्रिया स्थानिक पातळीवर करणे ह्या बाबी सुद्धा त्यांच्या धोरणांचा भाग होत्या. त्याचाच भाग म्हणून महेश्वरला वस्त्रोद्योगाला त्यांनी चालना दिली, त्यामुळे कापसावर प्रक्रिया हा उद्योग भरभराटीला आला. इतकेच नव्हे तर हे व्यवसाय शेतकऱ्यांनीच करावे यासाठी त्यांनी शासनातर्फे त्यांना भाग भांडवलही उपलब्ध करुन दिले.

शेतीचा विकास करतांनाच पर्यावरणाचा समतोल राखत संवर्धन करण्याचेही धोरण त्यांनी राबविले. ओसाड जमिनीवर आणि रस्त्यांच्या दुतर्फा आंबा, लिंब, चिंच, पिंपळ, वड, औदुंबर अशी झाडे लावण्यास त्यांनी चालना दिली. अशा झाडांची मुळे खोलवर जाऊन जमिनीत गारवा, ओलावा टिकून राही. जमिनीत पाणीसाठा वाढवण्यास मदत करणारी वड, पिंपळ, औदुंबर, कवठ, आंबा ही झाडे लावावी असा नियमही त्यांनी केला. अहिल्यादेवींची ही धोरणे त्याकाळी शेतकऱ्याला समृद्ध करण्यास कारणीभूत ठरली. अहिल्यादेवी यांच्या जन्म त्रिशताब्दीनिमित्त महाराष्ट्र शासनाने त्यांच्या नावाने शेतकऱ्यांसाठी कर्जमुक्ती योजना राबवून अहिल्यादेवींचा योग्य स्मृती जागृत ठेवल्या आहेत. महाराष्ट्र शासनही अहिल्यादेवींच्या धोरणांप्रमाणे शेतकऱ्यांचे हितरक्षक असल्याचे या कृतीतून दिसून येते.

**संदर्भ :-** १.विश्वकोषः- नोंद होळकर अहिल्याबाई. २. लोकमाता अहिल्याबाई होळकर, संपादक डॉ. देवीदास पोटे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

**- डॉ.मिलिंद दुसाने**
जिल्हा माहिती अधिकारी,
छत्रपती संभाजीनगर.

# सहकार सप्ताहानिमित्त पैठण येथे विणकरांचा मेळावा



छत्रपती संभाजीनगर, दि. ३ (प्रतिनिधी) – पैठण येथे प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग यांच्या वतीने सहकार सप्ताह निमित्त शासनाच्या योजनांची माहिती देणे व विणकारांकडून २०० युनिट वीज सवलत योजना योजना आणि गणेश चतुर्थी उत्सव भत्त्याचे अर्ज स्वीकृती करणे यासाठी विणकरांच्या मेळाव्याचे गुरुवारी (दि.२) आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमास पैठण पंचायत समिती सभापती सौ.वैशाली विनोद बोंबले, जिल्हा परिषद सदस्य शिवराज भुमरे, प्रादेशिक उप आयुक्त वसंत घुले हे उपस्थित होते. सहायक आयुक्त वस्त्रोद्योग प्रशांत सदाफुले यांनी वस्त्रोद्योग विभागाच्या दोन्हीही योजनांची परिपूर्ण माहिती दिली. योजनेसाठी अर्ज कशा प्रकारे करावा त्यासाठी लागणारे कागदपत्रे होणारे चुका कसा टाळाव्यात याविषयी विस्तृत मार्गदर्शन केले. शासनाकडून दोन्ही योजनांच्या अनुषंगाने सुरू असलेला पाठपुरावा नवीन विणकारांना ओळखपत्र देण्यासाठी केंद्रीय बूनकर सेवा केंद्र मुंबई यांना त्यांची तपासणी करून त्यांचा ऑनलाईन डाटा अपलोड करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

यावेळी प्रधानमंत्री महोदय यांच्या मनकी बात या कार्यक्रमात उल्लेख केलेल्या सौ. कविता ढवळे यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. तसेच आसावली महिला विणकर संस्थेच्या शशिकला भोसले तसेच अन्य महिला विणकर यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या वेळी पंचायत समिती सभापती सौ. वैशाली विनोद बोंबले, जिल्हा परिषद सदस्य शिवराज भुमरे यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालनव आभार प्रदर्शन प्रणाली हजारी यांनी केले.

# महाकर्जमुक्ती योजनेतील लाभार्थी शेतकऱ्यांना दिलासा, लाभ मिळेपर्यंत व्याज आकारू नये; शासन निर्णय निर्गमित

छत्रपती संभाजीनगर, दि. ३ (प्रतिनिधी) – राज्य शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना आणखी एक मोठा दिलासा देण्यात आला आहे. योजनेचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईपर्यंत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका तसेच विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी पात्र थकीत पीककर्जाच्या रकमेवर कोणत्याही प्रकारची व्याज आकारणी करू नये, असे स्पष्ट आदेश सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने जारी केले आहेत.




मंत्रिमंडळाने मंजूर केलेल्या कर्जमुक्ती योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. शासन निर्णयानुसार ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली पात्र पीककर्जे या योजनेसाठी ग्राह्य धरण्यात आली आहेत. अशा पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार असून, दोन लाख रुपयांपेक्षा अधिक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर एकवेळ समझोता योजनेचा लाभ मिळणार आहे. तसेच नियमित पीककर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे.

या योजनेत अल्पमुदतीची पीककर्जे तसेच पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित पीककर्जांचाही समावेश करण्यात आला आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी मानक कार्यपद्धती (SOP) निश्चित करण्यात आली असून, पात्र कर्जखात्यांची माहिती संगणकीय प्रणालीवर अपलोड करणे, कर्जखात्यांचे पडताळणीकरण, आधार प्रमाणीकरण आणि त्यानंतर कर्जमाफीची रक्कम संबंधित कर्जखात्यात हस्तांतरित करण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. शासनाने नमूद केले आहे की, ही संपूर्ण प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी काही कालावधी लागणार आहे. त्यामुळे कर्जमाफीची रक्कम प्रत्यक्ष खात्यात जमा होण्यापूर्वी शेतकऱ्यांच्या कर्जावर व्याज आकारल्यास त्यांच्यावर अतिरिक्त आर्थिक भार पडू शकतो. हे लक्षात घेऊन पात्र शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी लाभ मिळेपर्यंत थकीत पीककर्जाच्या रकमेवर व्याज आकारणी न करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या आदेशामुळे पात्र शेतकऱ्यांच्या थकबाकीत अनावश्यक वाढ होणार नसून, कर्जमुक्तीनंतर त्यांना नव्याने पीककर्ज उपलब्ध होण्याचाही मार्ग अधिक सुलभ होणार आहे.

कर्जमुक्ती योजनेची पारदर्शक आणि परिणामकारक अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी या आदेशाची तातडीने अंमलबजावणी करावी, असे शासनाने आदेशात स्पष्ट केले आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७९अ अंतर्गत लोकहिताच्या दृष्टीने हा आदेश जारी करण्यात आला असून, योजनेतील कर्जमुक्ती व एकवेळ समजोता योजनेस पात्र असलेल्या शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळेपर्यंत पात्र थकीत कर्जावर व्याज आकारणी न करण्याचे निर्देश सर्व संबंधित यंत्रणांना देण्यात आले आहेत.

# श्री. प्रदीप दातार यांचे निधन



छत्रपती संभाजीनगर, दि. ३ (प्रतिनिधी) – चेतना नगर येथील रहिवासी आणि इंडियन ओव्हर सीझ बँकेचे माजी कर्मचारी श्री. प्रदीप दातार यांचे गुरुवार दि. २ जुलै रोजी दीर्घ आजाराने दुःखद निधन झाले. अतिशय मनमिळाऊ स्वभाव आणि मोठा जनसंपर्क असलेले दिलखुलास व्यक्तिमत्त्व हरपले. त्यांच्या पार्थिवावर प्रतापनगर स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता. त्यांच्या मागे पत्नी, दोन विवाहित कन्या, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# पैठण गेटवरील लकी ज्यूस सेंटरवर एफडीएचा छापा

## मुदतबाह्य दूध अन् आइस्क्रीमऐवजी फ्रोझन डेझर्ट!!

छत्रपती संभाजीनगर, दि. ३ (प्रतिनिधी) – गजानन महाराज मंदिर रोडवरील याल्ला याल्ला आणि कांचनवाडी इटखेडा येथील आईच्या गावात या रेस्टॉरंटवरील कारवाईची चर्चा शहरभर खळबळ माजवत असताना, गुरुवारी (२ जुलै) सायंकाळी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकाने पैठण गेट येथील लकी ज्यूस सेंटरवर छापा मारला. या वेळी इतका घाणेरडापणा दिसला की हे लोक पैसे घेऊन लोकांच्या जिवाशी असे का खेळतात, असा संताप व्यक्त होत आहे. मुदतबाह्य दूध व मँगो पल्प, आइस्क्रीमऐवजी फ्रोझन डेझर्टचा वापर करून ज्यूस बनवले जात असल्याचे समोर आले.

अन्न सुरक्षा अधिकारी वर्षा रोडे यांच्यासह किर्तीका झाडे, प्रशांत अजिंठेकर, फरीद सिद्दीकी यांनी लकी ज्यूस सेंटरवर धडक दिली. मुदतबाह्य दूध व पल्पचा साठा जप्त करण्यात आला.

अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन झाल्याची नोंद करून दुकानमालकाला स्वच्छता राखण्यासह नियमांचे कठोर पालन करण्याच्या सूचना करण्यात आल्या. त्याचा परवाना रद्द करण्याची कारवाई आज, ३ जुलैला होणार आहे. याच परिसरातील फ्रेश ज्यूस सेंटर व न्यू लकी ज्यूस सेंटरचीही पथकाने तपासणी केली.

# शाहरुख खान यांनी रचला इतिहास; लॉस एंजेलिसमध्ये सुरू झाले नाइट रायडर्स क्रिकेट ग्राउंड






क्रिकेटच्या जगात नाइट रायडर्स ग्रुपने आणखी एक ऐतिहासिक कामगिरी केली आहे. स्वतःचे आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम उभारणारा हा जगातील पहिला ग्लोबल क्रिकेट ब्रँड ठरला आहे. लॉस एंजेलिसमधील नाइट रायडर्स क्रिकेट ग्राउंडने अधिकृतपणे आपला पहिला मेजर लीग क्रिकेट सामना यशस्वीरित्या आयोजित केला.

लॉस एंजेलिस नाइट रायडर्स आणि वॉशिंग्टन फ्रीडम यांच्यात झालेल्या या सामन्याने केवळ नव्या स्टेडियमची सुरुवातच केली नाही, तर अमेरिकेतील क्रिकेटसाठी कायमस्वरूपी आणि जागतिक दर्जाचे घर निर्माण करण्याच्या दिशेने मोठे पाऊल टाकले. यासोबतच, नाइट रायडर्स ग्रुप जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांमध्ये दीर्घकालीन गुंतवणूक करून क्रिकेटचा विकास करण्याच्या आपल्या दूरदृष्टीवर सातत्याने काम करत असल्याचेही यामुळे स्पष्ट झाले.

आंतरराष्ट्रीय मानकांनुसार उभारण्यात आलेले नाइट रायडर्स क्रिकेट ग्राउंड, अ खेळाडू आणि प्रेक्षक या दोघांनाही उत्कृष्ट क्रिकेट अनुभव देण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहे. मुख्य स्क्वेअरवर आठ विकेट्स, ICC मानकांनुसार खेळाचे परिमाण आणि १२० फूट उंचीचे सहा फ्लडलाइट टॉवर्स अशी या स्टेडियमची वैशिष्ट्ये आहेत. तसेच हे जागतिक दर्जाचे मैदान उभारण्यासाठी बांधकामादरम्यान ३२,००० मेट्रिक टनांहून अधिक माती हटवण्यात आली.

नाइट रायडर्स ग्रुपचे सह-मालक शाहरुख खान म्हणाले, 'जे कधीकाळी फक्त एक स्वप्न होते, ते आज वास्तवात उतरले आहे. जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक लोकप्रिय खेळ क्रिकेट लॉस एंजेलिसमध्ये आणणे हा आमच्यासाठी अत्यंत ऐतिहासिक क्षण आहे. फेअरप्लेक्स आणि नाइट रायडर्स यांच्यातील ही दीर्घकालीन भागीदारी केवळ क्रिकेट स्टेडियम उभारण्यापुरती मर्यादित नाही. आम्ही असा एक परिसर उभारत आहोत, जिथे समुदाय, एकजूट, उत्साह आणि मनोरंजनाचा उत्सव साजरा केला जाईल.'

ते पुढे म्हणाले, 'ही जागा केवळ खेळासाठी नाही, तर मनोरंजन, कुटुंबे आणि आयुष्यभर जपल्या जाणाऱ्या आठवणींसाठी तयार करण्यात आली आहे. आम्हाला विश्वास आहे की हे मैदान लॉस एंजेलिसमधील क्रिकेटचे नवे घर बनेल आणि पुढील अनेक पिढ्यांतील चाहते तसेच खेळाडूंना प्रेरणा देईल. हे लॉस एंजेलिससाठी आहे, जगभरातील क्रिकेट चाहत्यांसाठी आहे आणि संपूर्ण नाइट रायडर्स परिवारासाठी आहे.

नाइट रायडर्स स्पोर्ट्सचे उएज वेंकी म्हैसूर म्हणाले , 'नाइट रायडर्स क्रिकेट ग्राउंड, LA हे केवळ एक स्टेडियम नाही, तर क्रिकेटच्या भविष्याबाबतच्या आमच्या महत्त्वाकांक्षेचे प्रतीक आहे. स्वतःचे आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम उभारणारा जगातील पहिला ग्लोबल क्रिकेट ब्रँड होणे हा नाइट रायडर्स ग्रुपसाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. क्रिकेटच्या विकासासाठी जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा किती महत्त्वाच्या आहेत, हे यावरून दिसून येते. आमचे उद्दिष्ट असे मैदान तयार करण्याचे होते, जिथे खेळाडूंना खेळायला आवडेल, चाहते पुन्हा-पुन्हा यावेत असे वाटेल आणि स्थानिक समुदायाला ते आपले क्रिकेटचे घर वाटेल.'

हा ऐतिहासिक क्षण अधिक संस्मरणीय करण्यासाठी मेटा वर्ल्ड पीस (पूर्वीचे रॉन आर्टेस्ट) यांनी नाइट रायडर्स क्रिकेट ग्राउंड, LA येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या MLC सामन्यात सेरेमोनियल फर्स्ट बॉल टाकला. लॉस एंजेलिस लेकर्ससोबत NBA विजेतेपद पटकावलेले आणि लॉस एंजेलिसमधील सर्वात लोकप्रिय क्रीडापटूंमध्ये गणले जाणारे मेटा वर्ल्ड पीस यांच्या उपस्थितीने क्रिकेट आणि अमेरिकेतील मुख्य प्रवाहातील क्रीडा संस्कृती यांच्यातील वाढता दुवा अधोरेखित केला. तसेच, क्रिकेटला लॉस एंजेलिसच्या समृद्ध क्रीडा संस्कृतीचा भाग बनवण्याच्या नाइट रायडर्स ग्रुपच्या दूरदृष्टीचीही झलक यातून दिसली. नाइट रायडर्स क्रिकेट ग्राउंड, ङअ येथे १ जुलै ते ५ जुलैदरम्यान मेजर लीग क्रिकेटचे सामने खेळवले जाणार आहेत. यामुळे लॉस एंजेलिसला सर्वोच्च स्तरावरील ढ२० क्रिकेटचे यजमानपद लाभणार असून अमेरिकेत झपाट्याने वाढणाऱ्या क्रिकेटच्या विस्तारालाही नवी चालना मिळणार आहे.

**नाइट रायडर्सबद्दल**

नाइट रायडर्स आज आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील एक जागतिक ब्रँड बनला असून त्यांच्या नावावर एकूण ९ विजेतेपदे आहेत. या ग्रुपअंतर्गत चार व्यावसायिक फ्रँचायझी आहेत. कोलकाता नाइट रायडर्स (KKR), जी TATA IPL मध्ये खेळते; ट्रिनबागो नाइट रायडर्स (TKR), जी कॅरिबियन प्रीमियर लीगमध्ये सहभागी होते; अबू धाबी नाइट रायडर्स (ADKR), जी णअए च्या इंटरनॅशनल लीग ढ२० मध्ये खेळते; आणि लॉस एंजेलिस नाइट रायडर्स (LAKR), जी अमेरिकेच्या मेजर लीग क्रिकेटमध्ये सहभागी आहे. त्यामुळे नाइट रायडर्सला जगातील सर्वात प्रभावी आणि बहुआयामी T20 क्रिकेट ब्रँड्सपैकी एक मानले जाते.

KKR ने आतापर्यंत TATA IPL चे चार अंतिम सामने खेळले असून २०१२, २०१४ आणि २०२४ मध्ये तीन वेळा विजेतेपद पटकावले आहे. २०२१ मध्ये संघ उपविजेता ठरला होता आणि स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात उल्लेखनीय पुनरागमनांपैकी एक नोंदवले होते.

नाइट रायडर्स ग्रुपने ताबा घेतल्यानंतरच्या गेल्या ११ वर्षांत ढघठ पुरुष संघाने पाच वेळा CPL विजेतेपद जिंकले आहे. कॅरिबियनमधील हा सर्वात यशस्वी संघ असून २०२० मध्ये संपूर्ण स्पर्धेत एकही सामना न गमावता विजेतेपद जिंकण्याचा अनोखा विक्रमही त्यांच्या नावावर आहे. दुसरीकडे, नाइट रायडर्सच्या पहिल्या महिला संघाने, ढघठ थेशप ने २०२२ मध्ये झालेल्या पहिल्या WCPL स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. गेल्या अनेक वर्षांपासून नाइट रायडर्स अकादमी भारतासह जगभरातील उदयोन्मुख क्रिकेटपटूंचा शोध घेत आहे. प्रतिभावान खेळाडूंची ओळख करून त्यांची क्रिकेट कौशल्ये आणि फिटनेस वर्षभर विकसित करण्यासाठी ही अकादमी सातत्याने कार्यरत आहे.

सोमवार खेरीज दररोज
प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक
श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, पूकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# मराठवाड्यातील अग्निवीरांची सैन्य दलात निवड; प्रशिक्षणासाठी २ हजार ३५० अग्निवीर रवाना




छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- आर्मी रिक्रूटिंग कार्यालयाने फेब्रुवारी आणि मार्च २०२६ मध्ये आयोजित केलल्या भरती मेळाव्यामध्ये निवड झालेल्या उमेदवार यांना१९ जून ते ०३ जुलै २०२६ या कालावधीत अग्निवीर उमेदवारांना त्यांच्या संबंधित सैन्य प्रशिक्षण केंद्रांकडे रवाना केले.

निवडलेल्या उमेदवारांच्या या गटात तांत्रिक प्रवेशांतर्गत (ऊाम्फ्हर्म्ेि हूिंगे) सुमारे ६०० उमेदवारांचा समावेश होता, जो भरती प्रक्रियेतील आणखी एक महत्त्वाचा टप्पा ठरला.ही आव्हानात्मक मोहीम 'अग्निवज आर्टिलरी ब्रिगेड', विभागीय आयुक्त श्री. श्रीकांत, जिल्हाधिकारी श्री. विनय गौडा जी. सी, पोलीस आयुक्त श्री. प्रवीण पवार आणि भरती मेळाव्याच्या आयोजनाशी संबंधित सर्व शासकीय विभागांच्या सहकार्यातून पूर्ण करण्यात आली.

ही भरती प्रक्रिया दररोज सकाळी ०६:०० वाजता सुरू होऊन रात्री उशिरापर्यंत सुरू होती. दिवसभर चाललेल्या या प्रक्रियेत उमेदवारांच्या सर्व आवश्यक गरजांची आणि सुविधांची काळजी घेण्यात आली होती. बायोमेट्रिक पडताळणी, प्रमाणीकरण, कागदपत्रांची छाननी, सामान्य वैद्यकीय तपासणी, बॅचिंग आणि अंतिम रवानगी यांसारख्या प्रक्रिया नियोजित पद्धतीने पार पडल्या, ज्यामुळे प्रत्येक टप्प्यावर पारदर्शकता, कार्यक्षमता आणि अचूकता सुनिश्चित झाली. हे तरुण अग्निवीर लष्करी प्रशिक्षणाच्या प्रवासाला सुरुवात करत असताना ते राष्ट्राच्या आशा-आकांक्षा आपल्यासोबत घेऊन जात आहेत. त्यांच्या या प्रवासामुळे मराठवाड्यातील अनेक तरुणांना भविष्यात भारतीय सैन्यात अग्निवीर म्हणून सामील होण्याची प्रेरणा मिळेल, असे आर्मी रिक्रूटिंग कार्यालय ,छत्रपती संभाजीनगर कार्यालयाने कळविले आहे.

# आईस्क्रिम म्हणून फ्रोझन डेझर्टचा वापर;ज्युस सेंटरवर कारवाई



छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- आईस्क्रिम मधून फ्रोझन डेझर्टया प्रतिबंधित पदार्थाचा वापर आणि ज्युस साठी मुदतबाह्यसाठ्याचा वापर करणाऱ्या ज्युस सेंटर्सवर गुरुवारी (दि.२) अन्न औषध प्रशासन विभागाच्या पथकाने कारवाई केली.

गुरुवारी (दि.२) रोजी अन्न सुरक्षा अधिकारी श्रीमती वर्षा रोडे,प्रशांत अजिंठेकर, फरीद सिद्दीकी व कीर्तिका झाडे यांच्या पथकाने पैठण गेट परिसरातील मे. लकी ज्युस सेंटर, मे.फ्रेश ज्युस सेंटर, मे. न्यू लकी ज्युस सेंटर येथे अचानक जाऊन तपासणी केली.

या ठिकाणी पास्चुराइज्ड होमोजनाइज्ड टोनड दूध व अल्फान्सो मैंगो पल्प या अन्नपदार्थ चा मुदतबाह्य साठा ज्यूस तयार करण्यासाठी वापरण्यात येत असल्याचे निदर्शनास आले. तसेच आईस्क्रीम म्हणून फ्रोझन डेझर्टचा वापर करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले.या दुकानांवर कारवाई करण्यात आली असून ॲपरवाने निलंबीत करण्यात आले आहेत, तसेच जप्त केलेले साठे नष्ट करण्यात आले आहेत,असे सह आयुक्त अन्न श्रीकांत करकळे यांनी कळविले आहे.

# कर्मचारी समाधान शिबिरातील तक्रारी संवेदनशीलतेने हाताळा-अपर आयुक्त खुशालसिंह परदेशी

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- विभागीय कर्मचारी समाधान शिबिरात शासन सेवेत कार्यरत तसेच सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी त्यांच्या प्रलंबित सेवाविषयक अडचणी मांडतात. या तक्रारींवर नियमांनुसार तातडीने आणि संवेदनशीलतेने कार्यवाही करून त्यांचे निराकरण करावे, असे निर्देश अपर आयुक्त खुशाल सिंह परदेशी यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित विभागीय कर्मचारी समाधान शिबिरात ते बोलत होते. यावेळी उपायुक्त (विकास/आस्थापना) दादाराव वानखेडे यांच्यासह तक्रारदार सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

शिबिरात छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आणि जिल्हा परिषद येथील प्रत्येकी एका सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवाकालातील पदोन्नती लाभासंदर्भातील तक्रारींची सुनावणी करण्यात आली. संबंधित विभागांनी या प्रकरणांवर तातडीने नियमानुसार कार्यवाही करावी, असे निर्देश श्री. परदेशी यांनी दिले. तसेच अर्जदारांच्या तक्रारींवर संवेदनशीलतेने काम करून शक्यतो एका महिन्याच्या आत त्या निकाली काढाव्यात, असेही त्यांनी सांगितले.

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या या विभागीय कर्मचारी समाधान शिबिरात विभागीय स्तरावरील तक्रारींचे निराकरण करण्यात येते. मात्र, जिल्हास्तरावरील प्रकरणे विभागीय स्तरावर येण्याची वेळ येऊ नये, यासाठी संबंधित जिल्ह्यांनी तक्रारींचे प्रभावीपणे स्थानिक स्तरावरच निराकरण करावे. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक अडचणी वेळेत सोडविण्यासाठी संबंधित विभागांनी पूर्ण क्षमतेने कार्य करावे, असेही श्री. परदेशी यांनी नमूद केले.

मराठवाड्यातील शासन सेवेत कार्यरत तसेच सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित सेवाविषयक अडचणी जलद आणि कार्यक्षमतेने सोडविण्याच्या उद्देशाने विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या संकल्पनेतून संपूर्ण विभागात प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी 'कर्मचारी समाधान शिबिर' आयोजित करण्यात येते.

# अस्वच्छता खपवून घेतली जाणार नाही-मनपा आयुक्त




छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे आयुक्त अमोल येडगे यांच्या निर्देशानुसार, मा. अतिरिक्त आयुक्त-२ श्रीमती कल्पिता पिंपळे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ३ जुलै २०२६ रोजी आयएमए हॉल, समर्थनगर येथे महानगरपालिकेच्या सर्व आरोग्य केंद्रांमध्ये उच्च दर्जाची स्वच्छता राखण्याच्या उद्देशाने विशेष मार्गदर्शन बैठक आयोजित करण्यात आली.

या बैठकीत अतिरिक्त आयुक्त-२ श्रीमती कल्पिता किशोर पिंपळे यांनी राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत बाह्यस्त्रोत यंत्रणेमार्फत कार्यरत असलल्या सर्व सफाई कर्मचारी, सेवक व सेविकांना मार्गदर्शन केले. यावेळी शहर कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. ज्ञानेश्वर चौधर उपस्थित होते.

बैठकीदरम्यान वैयक्तिक स्वच्छता, सार्वजनिक स्वच्छता तसेच आरोग्य केंद्रांतील दैनंदिन स्वच्छता व्यवस्थापन या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. स्वच्छ, सुरक्षित व नागरिकाभिमुख आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्येक कर्मचाऱ्याने आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडावी, असे आवाहन करण्यात आले.

या मार्गदर्शन बैठकीस राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत बाह्य स्त्रोत यंत्रणेद्वारे कार्यरत सुमारे १५० सफाई कर्मचारी, सेवक व सेविका उपस्थित होते.

यापुढे महानगरपालिकेच्या सर्व आरोग्य केंद्रांमध्ये स्वच्छतेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नसून, प्रत्येक आरोग्य केंद्रात स्वच्छतेचे निर्धारित निकष काटेकोरपणे पाळले जातील, असे निर्देश अतिरिक्त आयुक्त-२ यांनी दिले. तसेच ज्या ठिकाणी स्वच्छतेबाबत गंभीर निष्काळजीपणा आढळून येईल, त्या प्रकरणी संबंधितांवर नियमानुसार प्रशासकीय कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले.

यासोबतच सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळेत गणवेश व ओळखपत्र अनिवार्यपणे परिधान करावे, तसेच त्याबाबत कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही, अशा स्पष्ट सूचनाही देण्यात आल्या.

बैठकीच्या समारोपावेळी उपस्थित सर्व सफाई कर्मचाऱ्यांनी 'स्वच्छ आरोग्य केंद्र, निरोगी नागरिक' या संकल्पनेला साकार करण्याचा संकल्प व्यक्त करत स्वच्छतेची प्रतिज्ञा घेतली. 'मी माझे आरोग्य केंद्र सदैव स्वच्छ व सुस्थितीत ठेवेन. कोणतेही काम कमी दर्जाचे नसते याची जाणीव ठेऊन मी माझी जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडेल', अशी प्रतिज्ञा घेतली त्यामुळे सफाई कर्मचारी यांच्यामध्ये सकारात्मकता निर्माण होऊन आपले आरोग्य केंद्र स्वच्छ राखण्याचा मानस सफाई कर्मचाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आला.

# शहराचा समृद्ध इतिहास उलगडणारा 'धावणी मोहल्ला हेरिटेज वॉक' रविवारी; गांधी पुतळा ते अप्पा हलवाईपर्यंत ऐतिहासिक वारशाची अनोखी सफर

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगरच्या समृद्ध ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि वास्तुशिल्प वारशाचा परिचय नागरिकांना व्हावा, तसेच जुन्या शहराचा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचावा या उद्देशाने मा . महापौर श्री.समीर राजुरकर यांच्या संकल्पनेतून व आयुक्त अमोल येडगे यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आणि इंटॅक, छत्रपती संभाजीनगर चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने 'धावणी मोहल्ला हेरिटेज वॉक' चे आयोजन करण्यात आले आहे.

हा हेरिटेज वॉक रविवार, दि. ५ जुलै २०२६ रोजी सकाळी ७.०० ते ९.०० या वेळेत आयोजित करण्यात आला असून, शहागंज येथील गांधी पुतळा येथून प्रारंभ होऊन पानदरिबा येथील अप्पा हलवाई येथे समारोप होणार आहे.

या हेरिटेज वॉकमध्ये सहभागी नागरिकांना शहागंज, सराफा, धावणी मोहल्ला आणि पानदरिबा परिसरातील ऐतिहासिक वास्तू, प्राचीन मंदिरे, उदासी आखाडा, भाई दयासिंहजी गुरुद्वारा तसेच शहराच्या सांस्कृतिक वारशाशी निगडित अनेक ऐतिहासिक स्थळांचा अभ्यासपूर्ण परिचय करून देण्यात येणार आहे. या परिसरातील वास्तुकला, परंपरा आणि इतिहासाची माहिती तज्ज्ञांकडून प्रत्यक्ष स्थळांवर देण्यात येईल.

यंदाचा हेरिटेज वॉक शहागंज येथील गांधी पुतळ्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त तसेच शीख पंथाचे भाई दयासिंहजी यांच्या ३६९ व्या जयंती वर्षानिमित्त विशेष स्वरूपात आयोजित करण्यात आला आहे. शहराचा ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी आणि नागरिकांमध्ये इतिहासाबद्दल जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात इतिहासप्रेमी, विद्यार्थी, संशोधक तसेच सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे,असे आवाहन उप आयुक्त तथा विभाग प्रमुख अंकुश पांढरे,सहायक आयुक्त ऋतुजा पाटील यांच्या वतीने करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी संपर्क: ९७६५७५४३८० / ९४२०७५९४५५.

# पहिले समजावले... नंतर कारवाई! रस्त्यावर कचरा टाकणाऱ्यांवर आयुक्तांचा धडक ॲक्शन' जनजागृती

**शिस्त आणि दंडात्मक कारवाईतून स्वच्छ छत्रपती संभाजीनगरच्या दिशेने आणखी एक ठोस पाऊल!**

छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे मा. आयुक्त श्री. अमोल येडगे यांनी सकाळी नियमित जॉगिंगदरम्यान शहरातील स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापनाची अचानक पाहणी केली. पाहणीदरम्यान रस्त्यावर कचरा टाकणाऱ्या नागरिकास त्यांनी प्रथम कचरा व्यवस्थापनाचे महत्त्व समजावून सांगितले. घरातील कचरा ओला, सुका, घरगुती घातक आणि सॅनिटरी अशा चार प्रकारांत वर्गीकरण करूनच महानगरपालिकेच्या घंटागाडीत द्यावा, असे आवाहन त्यांनी संबंधित नागरिकास केले.

त्यानंतर सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकल्याप्रकरणी मा. आयुक्त यांच्या आदेशान्वये संबंधित नागरिकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. झोन क्र. ५ पथकाने 'क्लीन स्ट्रीट ॲप' द्वारे ब्रिजवाडी चौक ते उत्तरानगरी, एमआयडीसी चिकलठाणा परिसरात कारवाई करून रु. ३,००० दंड वसूल केला.

पाहणीदरम्यान एक कर्मचारी धूम्रपान करताना आढळून आला. सार्वजनिक सेवेत कार्यरत कर्मचाऱ्यांनी कामाच्या वेळेत अथवा इतर कोणत्याही वेळी धूम्रपान करू नये, अशी समज देत संबंधित कर्मचाऱ्यास सुधारणा करण्याच्या उद्देशाने नोटीस बजावण्यात आली.

यावेळी मा. आयुक्तांनी शहरातील स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, घंटागाड्यांमधील वर्गीकृत कचऱ्याचे संकलन तसेच स्वच्छता व्यवस्थेची सविस्तर पाहणी केली. संबंधित अधिकारी, कर्मचारी, आयईसी टीम आणि घंटागाडी कर्मचाऱ्यांना नागरिकांना अधिक दर्जेदार स्वच्छता सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रभावी जनजागृती, शंभर टक्के कचरा संकलन आणि शंभर टक्के कचरा वर्गीकरण सुनिश्चित करण्याबाबत आवश्यक मार्गदर्शक सूचना दिल्या.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका नागरिकांना आवाहन करते की, सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नये. घरातील कचरा चार प्रकारांत वर्गीकृत करूनच घंटागाडीत द्यावा आणि 'स्वच्छ, सुंदर, हरित छत्रपती संभाजीनगर' घडविण्याच्या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा.

# गंगापूर, लासूर स्टेशन येथे उघड्यावर मांस विक्री करणाऱ्या १२ दुकानांवर अन्न व औषध प्रशासन विभागाची कारवाई



छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- गंगापूर व लासूर स्टेशन येथे उघड्यावर मांस विक्री करणाऱ्या १२ दुकानांवर कारवाई करण्यात आली. यापैकी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकाने गंगापूर येथील ५ आणि लासूर स्टेशन येथील १, अशा ६ विनापरवाना चालविण्यात येणाऱ्या दुकानांना सील ठोकण्यात आले.

सहआयुक्त श्रीकांत करकळे आणि सहायक आयुक्त दयानंद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रज्ञा सुरसे, प्रशांत अजिंठेकर व कर्मचारी, स्थानिक प्रशासन व आरोग्य विभागाच्या संयुक्त पथकाने गुरूवारी गंगापूर व लासूर स्टेशन येथील मांस विक्री करणाऱ्या गंगापूर येथील ८ आणि लासूर स्टेशन येथे ४ अशा एकूण १२ दुकानांची तपासणी केली. तेव्हा गंगापूर येथे विनापरवाना मांसविक्री करणारे ५ आणि लासूर स्टेशन येथील एका दुकानाला सील लावण्यात आले. स्थानिक प्रशासनाचे ना हरकत प्रमाणपत्र असल्याशिवाय अन्न विभागाचा परवाना मिळणार असल्याचे यावेळी पथकातील अधिकाऱ्यांनी दुकानदारांना सूचना दिली.

# फळपीक विम्यासाठी १४ जुलैपर्यंत मुदतवाढ; हवामानाच्या जोखमीपासून संरक्षणासाठी शेतकऱ्यांना दिलासा

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांना मोठा दिलासा देत संत्रा, मोसंबी, डाळिंब, चिकू, पेरू, लिंबू, द्राक्ष आणि हळद या पिकांसाठी विमा भरण्याची अंतिम मुदत १४ जुलै २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. शासनाची मंजुरी उशिरा मिळाल्यामुळे ही मुदतवाढ देण्यात आली असून, अधिकाधिक शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभागीय कृषि सहसंचालक सुनिल वानखेडे यांनी केले आहे.

सन २०२६-२७ या वर्षासाठी छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यांमध्ये ही योजना लागू करण्यात आली आहे. हवामानातील प्रतिकूल बदलांमुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीपासून फळबागांचे संरक्षण करण्यासाठी ही योजना महत्त्वपूर्ण ठरणार आहे. शेतकरी पीक विमा पोर्टलद्वारे स्वतः, आपले सेवा केंद्र, विमा प्रतिनिधी किंवा बँकेच्या माध्यमातून अर्ज करू शकतात. योजनेत कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक सहभागाची संधी असून, डिजिटल पीक सर्वेक्षण (DCS), AgriStack Farmer ID, आधार संलग्न बँक खाते आणि फळबागेचे जिओ-टॅगिंग अनिवार्य करण्यात आले आहे. योजनेअंतर्गत कमी पाऊस, पावसाचा खंड, अतिवृष्टी, जास्त तापमान, आर्द्रता आदी हवामान धोक्यांपासून विमा संरक्षण मिळणार असून, अधिसूचित हवामान केंद्रांवरील नोंदीच्या आधारे नुकसानभरपाई अदा करण्यात येणार आहे. संत्रा, मोसंबी, डाळिंब, चिकू, पेरू, लिंबू, द्राक्ष व हळद उत्पादक शेतकऱ्यांनी १४ जुलैपूर्वी, तर सिताफळ उत्पादकांनी ३१ जुलैपूर्वी विमा योजनेत सहभागी होऊन या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

# नविन रास्तभाव दुकानांसाठी अर्ज मागविले

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर शहर व ग्रामिण येथे नवीन रास्त भाव दुकान मंजूर करण्यासंदर्भात जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला असून पंचायत, गट संस्था यांच्याकडून अर्ज मागविण्यात आले आहेत, असे तहसिलदार व अन्नधान्य वितरण अधिकारी यांनी कळविले आहे.

शहर हद्दीतील मौजे सावित्रीनगर चिकलठाणा व ग्रामिण हद्दीत बजाजनगर लोकमान्य चौक येथे एककांमध्ये वाढ झाल्यामुळे नवीन रास्तभाव दुकान मंजूर करण्यात येणार आहेत. त्यासाठी इच्छुक संस्थांनी दि.३१ जुलै पर्यंत कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करावे,असे आवाहन तहसिलदार व अन्नधान्य वितरण अधिकारी यांनी केले आहे.

# मनाई आदेश जारी

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- आगामी कालावधीत जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून जिल्ह्यातील ग्रामीण भागात महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व ३७ (३) अन्वये मनाई आदेश जारी करण्यात आले आहेत. अपर जिल्हादंडाधिकारी जनार्दन विधाते यांनी हे आदेश निर्गमित केले असून दि.४ ते १८ जुलै दरम्यान हे आदेश अंमलात राहतील,असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

## छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका, ई-निविदा सुचना

जा.क्र./मनपा/ई- निविदा/२०२६/६३
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका
दिनांक:- ०३.०७.२०२६

| अ.क्र. | कामाचे नावं | निविदा भरण्याची अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १ | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कांचनवाडी येथील प्राण्यांच्या शवदाहिनी (Pet Crematorium Incineration) येथे साईट डेव्हलमेंट करणे. | ०६.०७.२०२६ |
| २ | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील एकूण ०४ आकांक्षी शौचालय चालविणेसाठी मागविण्यात येणारे स्वारस्य प्रगटन. २०२५-२०२६ | ०९.०७.२०२६ |
| ३ | चिकलठाणा आठवडी बाजार. | १०.०७.२०२६ |
| ४ | उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाकरिता खते, किटकनाशके व सेंद्रीय Product चा पुरवठा करणे. | १०.०७.२०२६ |
| ५ | सिध्दार्थ उद्यानातील लॉन प्लॉट करीता Sprinkler, Drip and Hydrant Irrigation System ची उभारणी करणे. | १०.०७.२०२६ |
| ६ | सिध्दार्थ उद्यान येथील ट्राफिक थिम प्लॉट (आमराई) येथे लॉन व शोभिवंत रोपांची लागवड करणे. | १०.०७.२०२६ |
| ७ | सिध्दार्थ उद्यानातील तिकीट घरामागील, अंतर्गत मुख्य रस्त्याच्या उजव्या बाजुस असलेल्या लॉन प्लॉट ची अस्तित्वातील माती काढुन, नवीन माती टाकणे आणि नवीन लॉन लागवड करणे. | १०.०७.२०२६ |

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांचे वतीने योग्यत्या वर्गातील ठेकेदारांकडून ई- निविदा मागविण्यात येत आहे. निविदेची विस्तृत माहिती संकेतस्थळावर www.mahatenders.gov.in येथे उपलब्ध आहे.

स्वाक्षरीत/-
सिस्टीम मॅनेजर (ई-निविदा)
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

(पान १ वरुन)

## पुढील ४ दिवसात राज्यात मुसळधार पाऊस

सध्या जोरदार पाऊस सुरू आहे. जोरदार पाऊस असल्यामुळे उपनगरात काही सखल भागात पाणी भरायला सुरुवात झाली आहे. असंच जोरदार पाऊस सुरू राहिला तर सकाळच्या वेळी मोठा संख्यामध्ये मुंबईकर चाकरमानी कामासाठी निघणार आहे. या पावसाच्या फटका त्यांना बसण्याची शक्यता आहे.

मुंबईत आजही ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून ठाणे पालघरसह रायगडमध्येही मुसळधार पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. तर राज्यातील इतर भागातही ७ जुलैपर्यंत पावसाचा जोर कायम राहणार असल्याची शक्यता आहे.

## कुंभमेळ्याच्या निधीत २४१ कोटींचा घोटाळा!

रुपयांची विविध रस्त्यांची टेंडर्स काढण्यात आली आहेत. मात्र, ही टेंडर्स मिळवण्यासाठी मुख्य अभियंता प्रशांत अवटी आणि हर कन्स्ट्रक्शनचे विलास बिरारी यांनी मिळून १६ कंपन्यांची रिंग तयार केली असल्याचा आरोप परब यांनी केला.

२०१८ च्या सरकारी जीआरनुसार, जर एखादा कंत्राटदार एका निविदेत पात्र ठरला, तर त्याला दुसऱ्या निविदेत अपात्र ठरवता येत नाही. मात्र, या अधिकाऱ्यांनी स्वतःच्या मर्जीतील कंत्राटदारांना कामे देण्यासाठी नियम धाब्यावर बसवले. "एका निविदेत पात्र ठरलेल्या कंत्राटदाराला दुसऱ्या निविदेत हेतुपुरस्सर अपात्र ठरवण्यात आले, जेणेकरून पूर्वनियोजित कंत्राटदारालाच काम मिळेल," असा दावा परब यांनी कागदपत्रांचा दाखला देत केला.

"तुम्ही देवाच्या पैशांवर डल्ला मारत आहात. अजून काम पूर्णही झाले नाही आणि रस्त्यांना तडे गेले आहेत. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून संबंधित अधिकारी आणि कंत्राटदारांवर फौजदारी गुन्हे दाखल करा," अशी थेट मागणी अनिल परब यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांकडे केली.

मुंबई महानगरपालिकेतील निधी वाटपावरून परब यांनी सरकार आणि पालिका प्रशासनावर सडकून टीका केली. मुंबईत ठाकरे गटाचे ६५ नगरसेवक निवडून आले होते, त्यांना विकासकामांसाठी केवळ २५ लाख रुपये निधी देण्यात आला आहे. तर, भाजप आणि शिंदे गटाच्या नगरसेवकांना अडीच कोटींपासून ते १५ कोटी रुपयांपर्यंत निधी देण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला.

## महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम...

नागपूर, अहिल्यानगर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर आणि सोलापूर या आठ जिल्ह्यांतील प्रमुख शहरांमध्ये गुलाबी ई-रिक्षा ही योजना सुरू करण्यात आली.

या योजनेअंतर्गत महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याबरोबरच महिला प्रवाशांना सुरक्षित प्रवासाचा पर्याय उपलब्ध करून देणे हा मुख्य उद्देश आहे. त्यामुळे ई-रिक्षा चालविणारी व्यक्ती महिला असणे ही अट ठेवण्यात आली आहे. मात्र, अनेक अर्जदारांनी रिक्षा स्वतः चालविण्याऐवजी दुसऱ्याला चालविण्यास देण्याची अपेक्षा व्यक्त केल्याने अनेकांनी अर्ज मागे घेतल्याचे मंत्री तटकरे यांनी सांगितले.

त्यांनी सांगितले की, आतापर्यंत १३० गुलाबी ई-रिक्षांचे वितरण करण्यात आले असून त्या यशस्वीपणे सुरू आहेत. या योजनेत ई-रिक्षाच्या खर्चापैकी २० टक्के अनुदान शासनाकडून, ७० टक्के बँक कर्जाद्वारे आणि १० टक्के लाभार्थीचा सहभाग ठेवण्यात आला आहे. लाभार्थ्यांचा आर्थिक सहभाग असल्यास योजनेबाबत जबाबदारी आणि सातत्य राहते.